
लघु
सारांश
'पूरु'
प्रद्यूम 'पूरब'

**दहावीत** शिकत असलेल्या एका मुलाने लिहीलेली ही लघु कादंबरी. एका भव्य कादंबरीचा शुभारंभ.

ही तुम्हाला विनामूल्य वाचायला देण्याचा एकच हेतू आहे, तो म्हणजे तुमचा अभिप्राय जाणून घेणं. या महाकादंबरीच्या जडणघडणीत सुजाण वाचकांच्या सूचनांचा आभारपुर्वक समावेश करणं. ती महाकादंबरी सर्वार्थाने "महा" होण्यासाठी.

वाट पहातो. फ़ोन, whatsapp, email साधे पत्र. आणी शक्य असल्यास प्रत्यक्ष भेट. कोणत्याही पद्धतीने आपला अभिप्राय नक्की पोहोचवा.

प्रद्युम राकेश चिलकेवार

39 साई नगर, उमरेड, दिघोरी, नागपूर

भ्रमण ध्वनी -9307537644

ई-मेल- pradyumchilkewar3@gmail.com

## लेखक परिचय




प्रद्युम राकेश चिलकेवार 'कवि पूरब'.

वय- 16

39 साई नगर, उमरेड, दिघोरी, नागपूर

शिक्षण- संजूबा हाय स्कूल 10 वी.


प्रथम पुस्तक 'आहुत्य' -

https://www.amazon.in/Ahutya-Pradyum-Chilkewar/dp/B09HR3MWD3/ref=mp_s_a_1_1?crid=4RAWN0GTZJUW&keywords=pradyum+chilkewar&qid=1638810466&sprefix=pradyum+chilkewa%2Caps%2C439&sr=8-1

Youtube channel - kavi purab

https://youtu.be/lWbMP6h4K1Y


भ्रमण ध्वनी -9307537644

ई-मेल- pradyumchilkewar3@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# पुरु

(लघुकादंबरी)

## लेखक : प्रद्युम पूरब

# पुरु

## लेखक प्रद्युम पूरब

**मेल – prathameshdahale1@gmail.com**

**पत्ता – स्वामी समर्थ अपार्टमेंट , अशोक नगर , सातपूर , नाशिक.**

मुखपृष्ठ: प्रद्युम चिल्केवार

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com
esahity@gmail. com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : १० डिसेंबर २०२१,
( मार्गशीर्ष शु. सप्तमी शके १९४३ )

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखकाचे दोन शब्द -

फार छान वाटतं कि आयुष्यात अशी देखील लोकं मिळतात जे आपल्या कलेला प्रोत्साहन देतात. आणि ते मला मिळाले/ फार उत्कट आणि निराळ्या ‘online’ पद्धतीत - ई-साहित्य! माझ्याकडे बोलण्याइतपत अश्या काही मोठ्या गोष्टी नाहीत. केवळ आहे ते एक बालमन. थोडं विचित्र नि थोडं विचित्रच!

माझी आवड - वाचन आणि लेखन. कादंबऱ्या, काव्य नि कविता हेच माझे आई-वडील, गुरु आणि आयुष्य. कविवर्य बा.भ बोरकर हे माझे सर्वात आवडते कवी. शिवाय तुकोबांचे अभंग देखील माझे फार आवडते आहे. मला आताही माझ्या आठव्या वर्गातील असलेली सर्वात पहिली तुकोबांची संतवाणी - ‘आम्हा घरी धनं शब्दांची रत्ने …’ ही आठवते. नि आयुष्याची रूळ देखील याच आठवणीतील गुंतलेली आहे.

वाचकांनो, मला काही नकोय, फक्त तुमचा प्रतिसाद हवंय. लेखनातील तोटा, आपली मतं, लेखन, शब्द नि कल्पना आपणास कशी वाटली हे जर स्वतंत्रपणे कळले तर फारच छान!

धन्यवाद !

माझे मानस गुरुवर्य

श्री वि. स. खांडेकर

यांचे चरणी समर्पित.

प्रद्युम

# “पुरु”

# प्रथम पार्श्व

## भाग एक - इंद्र

# १

मी कोण? मी ...., मी कोण? मी साक्षात इंद्र! देवांचा राजा, सुरांचा सुर - इंद्र! रत्न, माणिक, हिऱ्यांनी अलंकृत झालेल्या स्वर्ण सिंहासनावर मी विराजमान आहो. त्रिलोकात कुणीही पर्जन्य माझ्याशी तुलना करण्यास समर्थ नाही. आज माझ्याकडे काय नाही? जगाचं सारं ऐश्वर्य माझ्या चरणी लुळतं! निष्प्रभ झालेल्या आसमंतात जितकी चांदणं नसावी तितकी सुखं माझ्या सिंहासनावर आहे! एखाद्या नक्षत्रावती स्त्रीचं अंग सुवर्ण दागिण्यांनी अलंकृत करावं तसं माझं जीवन आहे. विविध प्रकारची दागिणे माझ्या व्याधीला माझ्या इच्छेनुसार त्यांच्या चमत्काराने नक्षम करतात.त्रिलोकात एकमात्र अशी जागा जिच्या सौंदर्यानं समस्त त्रिभुवन, धरती, अंबर, मनुष्य,असुर,देव सर्व मोहून गेले आहे, ज्याचं रूप बघून प्रत्येक जीव या जगात येण्यास तळमळतो,ज्याच्या छत्रात पाऊल टाकण्याचे आजीवन स्वप्न बघतो,असं हे माझं स्वर्ग आहे! अरे कुठे धरतीलोक नि कुठे माझं स्वर्गलोक! ब्रह्मदेवाची सर्वात रुपर्ण कलाकृती, सहस्र चंद्रांना लाजवेल असं अभूतसौंदर्याने आविर्भूत असलेलं माझं स्वर्ग आहे! नि मी, समस्त देवांचा नृप अहो - साक्षात इंद्र!

इंद्राचं नाव ऐकून आज ही असुरांचे कंठ शुष्क होतात! माझ्या इंद्रवज्राने समस्त जीव थरथरतात! माझी शक्ती अनिष्ट आहे. ऐरावताच्या रथावर बसून मी समस्त धर्तीलोकाचं भ्रमण केलं. सम्पूर्ण असुर जातिचा मी स्वशक्तीने पराभूत केला. सर्वोच्च असा इंद्रपद भूशिवलं, देवांचं राजमुकुट मस्तकी धारण केलं,समस्त सुरांचा राजा झालो,मग मी सर्वश्रेष्ठ नाही का? माझ्यात काय अल्प आहे? काहीच नाही! मी संपूर्ण अहो,सर्वशक्तिमान अहो! हा इंद्र अनंत आहे, त्याला कशाचच भय नाही!!

लक्ष्य लक्ष्य वर्षांपासून मोठमोठ्या ऋषी-मुनींनी माझं स्वर्गपद हिसकण्याकरीता तप आरंभ केले. मोठमोठी दिव्य सिद्धी प्राप्त करून मला भस्म करून माझं स्वर्ग त्यांना हवं होतं. त्या दोन कौडीच्या, चिखलात रापणाऱ्या किरीटांसाठी - त्या असुरांसाठी स्वर्गात स्थान मिळावं म्हणून दैत्यगुरू शुक्राचार्यांनी तप आरंभ केले.पण मी सुद्धा इंद्र होतो, मी त्या असुरांना स्वर्गात प्रवेश देईल? मुळीच नाही. माझं स्वर्ग वाचविण्याकरिता होईल त्या मार्गाच्या टोकापर्यंत मी जाईल! मग ते बळ असो की छळ असो, मला हरकत नाही! महाभारतात पांडवांचा पराभूत होऊ नये म्हणून साक्षात श्रीकृष्णाने छळ नव्हते केले काय? मलयोद्धा बालीचं वध भगवान रामाने लपून बाण मारून नव्हतं केलं काय? ते सुद्धा छळच होतं ना? मग मी आपल्या रक्षणार्थ छळ का करू नये?

# २

प्रत्येक मनुष्य,प्रत्येक जीव हा शारीरिक वासनेचा नि प्रणयेचा दास असतो. सौंदर्य वशीकरण के वज्राच्या प्रहरावरूनही घातक असते. या प्रहरात जीवाला एक जखम सुद्धा न देता घावाचा घण घालता येतं. या प्रहरात व्रण आहे ते सुखाचे, रक्त आहे ते प्रीतीचे, नि वार आहे ते अंतरंगाचे!

जीव कितीही मोठा प्रण घेवो, त्याचं चित्त कधीच स्थिर नाही राहत.अंतरंगाची अतृप्ती कोणत्याही प्रणाला सहज वशीभूत करते. मन आणि शरीर यांच्या द्वंद्वयुद्धात सदैव शरीरच विजयी ठरतो. मग मानवच काय,पशु, असुर, ऋषी, मुनी, नि साक्षात देव सुद्धा या युद्धात विफल होतात. कारण - प्रीती! सुख! संभोग! एकांत! ब्रह्मदेवाने या जगाची किती अद्भुत निर्मिती केली आहे! त्याने सर्व जीवांना सुख मिळावे म्हणून दोन परस्पर देह बनवली. गंधाचा एक स्पर्श होताच मन मोहून जाते अशी टवटवीत नि सौंदर्यपूर्ण फुलं बनवली. प्रीतीही तशीच आहे जिच्या संगमात जीव स्वतःचं देह भान विसरून जातो. भगवान उमाशंकर कैलासावर का राहतात? कारण त्यांना एकांत हवा, एकमेकांचा सहवास हवा, प्रीती हवी, म्हणून! स्त्रीचा स्पर्श अंगाच्या कणकणाला पुलकित करून जातो.

त्यांचा सहवास, ती प्रणया, ते एकांत क्षण दोन जीवाला जगातून विलीन करून जातात. वसंत ऋतूत आभाळात दोन ढंगाचं मिलन व्हावं तसं नभरूपी जीवनात दोन ढगरूपी देहाचं मिलन होते. खळखळ वाहणाऱ्या नद्यांचं संगम म्हणजे दोन ओठांचा संगम! ब्रह्मदेवाने सर्व जीवांची रचना अशीच केली आहे हे सत्य नाही आहे का? मग मी तर केवळ या रचनेचा लाभ घेतला. अप्सरांच्या मोहाने ऋषींची तपस्या भंग पावली तर यात दोष काय आहे? ऋषींचं बळ- मंत्र आहे, माझं - 'प्रीती'! या प्रीतीच्या मोहात बुडून त्यांचे तप भंग पावतात, मग प्रीती हेच सर्वात मोठं तप नाही काय? हेच सर्वात मोठं शस्त्र नाही का? मग कशाला करायची ही तपं-वपं? कशाला प्राप्त करायच्या दिव्य सिद्धी वगैरे?

काही वर्षांपूर्वी दैत्यगुरु शुक्राचार्य तपश्चर्येला बसले होते. दैत्यगुरूंचं तपश्चर्येला बसणं म्हणजे स्वर्गावर संकट! राक्षसांचा सर्वात मोठा प्रहार! शुक्राचार्यांची तपश्चर्या अतूट होती. मनाचा बांध अगदी घट्ट होता. मला भय वाटू लागलं. जर शुक्राचार्यांची तपश्चर्या भंग झाली नाही नि त्यांनी महादेवांना माझं इंद्रपद मागितलं तर? हे सारं वैभव मी गमावून बसेल! हे स्वर्ग, यातील सुख, ऐश्वर्य, विलास, सारं -सारं आकाशात ढग निष्प्रभ व्हावे तसं माझ्या जीवनातून निष्प्रभ होऊन जाईल! नाही ....! मी.., मी हे होऊ देणार नाही! मी

माझं स्वर्ग कुणालाही देणार नाही! हे सर्व माझं आहे, हे सिंहासन माझं आहे, मी हे कुणाला का देऊ? नाही! मुळीच नाही! काहीही करून ऋषि शुक्राचार्यांची तपश्चर्या भंग झालीच पाहिजे!

इंद्रपद वाचवण्यास मी खूप प्रयत्न केले. कृष्ण नदीच्या किनारी वटवृक्षाच्या खाली कमंडलू घेऊन शुक्राचार्य मृगाजिनवर तप करत बसले होते. 'ॐ नम: शिवाय, ॐ नम: शिवाय' हे मंत्र प्रत्येक क्षणी माझ्या कानात एखाद्या तीक्ष्ण बाणाप्रमाणं खोल खोल रुतत होते. मी पळ-पळ अस्थिर होत होतो. काय करावे मला काहीच सुचेना. क्षीर्ण व्याकुळता, भीती, भवितव्य, सतत एका अनामिक दर्पणाप्रमाणं माझ्या डोळयांसमोर येई. मी एके दिवशी मेघदूतांना आदेश केला.

"इतका मुसळधार पाऊस करा की महासागरदेखील क्रोधाने भक्षक होऊन जाईल! ढगांची वृष्टी जोपर्यंत शुक्राचार्यांची तपश्चर्या भंग पावत नाही तोपर्यंत कोसळली पाहिजे. विजांचा कल्लोळ झाला पाहिजे. असा प्रचंड कंप करा की धरतीवरील दुसऱ्या कुण्या ऋषीने इंद्रपद प्राप्तीसाठी पुन्हा तप करता कामा नये! जा मेघांनो, सारी तपं निःपात करा!"

माझ्या आदेशानुसार मेघांनी रौद्ररूप धारण केले. समस्त धरती पुरात बुडून गेली, पण माझं क्षम्य काही सिद्ध झालं नाही.

शुक्राचार्यांचा तप भंग झाला नाही. मग मी अग्निदेवाला आज्ञा केली. खळखळीत अग्नीरसाची ज्वाला सर्वभूत पसरली. कृष्ण नदीचे सजल पाणी अग्नीत रूपवय झाले. समस्त धरतीवरील जीव नामशेष झाले, पण तरीही तपश्चर्या अभंग राहिली. मला काहीच सुचेना. इतकं क्रूर आघात करूनही शुक्रचार्यांना काहीच कसे झाले नाही? मी स्तंबीत झालो, उद्विग्न झालो. आता माझ्याकडं केवळ एकच पर्याय शिल्लक होता- महादेव!

मी महादेवांकडे गेलो. त्यांनी माझी चिंता ओळखली.

“इंद्र, एवढी चिंता?”

“महादेव! माझं इंद्रपद धोक्यात आहे. शुक्राचार्यांनी दैत्यांना स्वर्ग मिळावा म्हणून घोर तपश्चर्या आरंभ केली आहे. महादेव, जर दैत्य स्वर्गात येईल तर स्वर्गलोकाचं नरकात रूपान्तर होऊन जाईल! हे दैत्य कसे आहे हे आपणास देखील पूर्णपणे ठाऊक आहे. समुद्रमंथनाच्या वेळी अमृताच्या मागे आस धरली, युद्ध केलं. नि आता, स्वर्ग प्राप्तीसाठी सिद्ध झाले!! महादेव, मी खूप प्रयत्न केला. भूवरील मुसळधार पावसाची वृष्टी केली, अग्नी रसात समस्त भूमी जाळून टाकली. तरीही शुक्राचार्यांची तपश्चर्या काही केल्या भंग झाली नाही!”

हे ऐकताच महादेव माझ्यावर क्रोधीत झाले. अग्नीत इंगुदीचं थेंब बुडताच प्रचंड ठिणग्या उद्भासित होतात त्याचप्रमाणे महादेवांची मुद्रा झाली होती.

"इंद्र, आम्हास हे सर्व ठाऊक आहे. तुझे कुकर्मच आज तुला बळी पडत आहे! कुठल्याही तपोमग्न जीवाला त्रास देणे हे घोर पाप असते. जे ईश्वराचं स्मरण करतात त्यांचं रक्षण स्वयं ईश्वर करतं! दैत्यगुरू शुक्राचार्य माझं मंत्रपठण करत आहे. तू जितकी ही डाव खेळलास ते केवळ एक भ्रम होतं इंद्र! तुझे मेघ जेव्हा रौद्र वृष्टी करत होते, तेव्हा शुक्राचार्य माझं पठण करत होते. माझ्या दिव्य मंत्रानेच धरतीचं रक्षण झालं. तू जे केलं ते केवळ भ्रम म्हणून राहून गेलं! मंत्राची शक्ती, पवित्र मन, नि अंतराच्या आत्मज्ञानाने जो जगाच्या कामनेची वृद्धी करतो, त्याच्या परिश्रमात आपोआप दिव्यता येते! इंद्र, तुझ्या या पापाला क्षमा नाही!!"

ते सर्व महादेवांची माया होती! मी चुकलो होतो काय? होय, मी चुकलो. पण माझ्या अंतरंगात केवळ आणि केवळ इंद्रपद होतं, राज सिंहासन होतं, स्वर्गीय सुख होतं. इंद्रपद अमर होते, अनंत होते! मग मी कोणत्या दुसऱ्या भवितव्याचा विचार का करावा? चुका सर्व करतात, मी सुद्धा केली. ऐरावतावर आरूढ होऊन मी ध्वस्त मनाने आकाशाकडे झेप घेतली. मन अगदी विसावून गेलं

होतं. जर माझा इंद्रपद नामशेष होईन तर माझं जीवन कसं होईल? सुख-वैभवाचे काजवे सोडून एखाद्या अथम्ब पक्षीप्रमाणे मला भ्रमण करावं लागेल! त्रिलोकात कुठे ही न मिळणारं ऐश्वर्य सोडून मला एखाद्या लंपट जटाधारी ऋषीप्रमाणं हातात कमंडलू नि मृगाजिन घेऊन स्वैर फिरत राहावं लागेल! अष्टौप्रहर पालेभाज्या ग्रहण करून उदर भरावं लागेल! प्रतिदिन नव्य-नव्य सोमरसांच्या मादकतेत उन्माद करणाऱ्या इंद्राला साधं पाणी ग्रहण करावं लागेल! जीवनाची तृष्णा तृषितच राहून जाईल!

## ३

अंगाचं कण अन कण व्याकुळतेने शहारत होता. मला काहीच सुचेना. अमावास्येच्या रात्री चंद्रकिरणाची कोर लोप पावावी तसे अंतराचे चांदणे लोप पावले. धारधार अग्रभाग असलेल्या बाणांची वृष्टी एकाच प्रहारात करावी नि सर्व बाण अंगाच्या रक्तात रुतून जावे तशीच भवितव्याची भीती माझ्या काळजातील खोलवर खोल जाऊन रुतत होती. या भीतीने माझे कंठ कंपित होत होते. शरीराच्या भागावर वज्राच्या प्रहरानंतर रक्ताचा अमीट व्रण जसं नेमून जातं, काही केल्या ते मिटत नाही, तसं या भीतीचं व्रण काही केल्या माझ्या मस्तकातून मिटेना. हे ऋषीमुनी स्वतःला समझतात तरी काय? अष्टौप्रहर केवळ ध्यानमग्न राहून सतत ब्रह्मदेवाचे मंत्र पुटपुटत असतात! कोणती न कोणती दिव्य विद्या अंगभूत करायला पाहतात. नि ती विद्या हस्तगत झाली की संसाराला भीती दाखवतात! त्यांची कटुवाणी नेहमी सत्य होते! त्यांचे शाप कधीही विफल जात नाही! मंत्राच्या शक्तीने वाटेल त्याला ते शापग्रस्त करतात! याच भीतीने संसार त्यांना घाबरतं! नाहीतर यात कोणती महानता आहे? भगवान परशुरामांनी आपल्या क्रोधाने समस्त धर्तीलोकाला कित्येक वेळा नष्ट केले होते! भ्राताची आज्ञा मानून

लक्ष्मणाने ऋषी दुर्वासांना रामाला भेटण्यास मनाई केली. ‘जर तू मला रामाला न भेटू दिलस तर ही तुझी सारी अयोध्या नगरी मी भस्म करून देईन!’ अशी धुडकी ऋषिवराने दिली. अयोध्येच्या रक्षणार्थ लक्ष्मणाने भावाची आज्ञा टाळली. शेवटी त्याने आपले प्राण सोडून दिले! पण ते कोणापायी? तर- त्या ऋषीपायी! जराशी यांना वृहत दिव्यता काय प्राप्त झाली, हे तर उन्माद करू लागले! वाटेल ते करू लागले! अहंकार करू लागले! यात कसली महानता आहे? यात कोणती दिव्यता आहे? मग जगाने याना श्रेष्ठ का म्हणावं? यांची पूजा का करावी? जग वेडं असतं हेच खरं!!

सहस्र प्रयत्न झाले, पण जे हवं होतं ते दूरच राहून गेलं. आता माझा भवितव्य निश्चित होता. कोणत्याही क्षणी महादेव प्रकट होईल नि शुक्राचार्य मागेल ते वरदान महादेव त्यांच्या पदरात घालून देईल! मग …., मग माझं स्वर्ग …? हा विचार सतत अंतर्मनाला सलत होता. भीती, चिंता, क्षीर्णता, व्याकुळता, शल्य, दुःख, वेदना या सर्व व्याधीत मी फसून गेलो होतो! मला काहीच सुचेना, काहीच नाही! चिंताग्रस्त मुद्रेत विसावून जाऊन एखाद्या जिवंत मूर्तीप्रमाणे माझी मुद्रा स्तब्ध झाली होती. शयनकक्षाच्या दिवाणावर विचारमग्न होऊन मी एकस्थानी बसलो होतो. जणू मला वर्तमानाचा विसर पडला आहे, असे मला वाटे. तेवढ्यात

शयनकक्षात ‘छन-छन’ असा नाद फिरू लागला. रत्नांच्या इवल्या ठिपक्यांनी ठिपलेलं नि समुद्रात सापडलेल्या मोत्यांना गुच्छ करून, ते गुच्छ अगदी पातळ, निथळ बिंदूत रूपान्तर होऊन ते टपोरे मोतगुच्छबिंदू ‘छन-छन’ असा नाद करणाऱ्या घुंघरुत मिसळून गेले आहे नि या दोघांच्या आलिंगनातुन नादस्पर्शी नुपूर तयार झाले आहे. तेच नुपूर कोणाच्या तरी पायात घातले होते! मला वाटले हे माझे भ्रम आहे! चिंतेच्या अवस्थेत मला कवी मनाचे वैराग्य तर नाही झाले ना? पण ते भ्रम नव्हते! ते …, ते सत्य होते!

पावला पावलांवर चाळींचा ‘छन छन’ नाद करत, शयनकक्षाच्या दालनातून एका सुंदर आकृतीने प्रवेश केला. तेव्हा मी तेवढे लक्ष दिले नाही. माझे डोळे बंद होते. चिंतेच्या अश्रूत भिजत होते. त्या चाळींच्या नादाने कोणीतरी कक्षात प्रवेश करत आहे याची मला थोडी जाणीव झाली. माझ्या मस्तकावर इंद्रमुकुट नव्हता. अंगावरची अलंकारं सुद्धा देहाहून दूर झाली होती. माझे मन देखील अगदी, अगदी एकांत झाले होते. मी आपला देहभान विसरून गेलो होतो. जणू चिंतेच्या आवाक्यात गळून मी वर्तमानाशी विलीन झालो होतो. तेवढ्यात माझी चिंताग्रस्त मुद्रा एका नाजूक स्वराच्या स्पर्शाने भंग होऊन गेली.

“देवराज!”

माझं ध्येय तुटून गेलं. अंधारी भुयाराच्या मुखात चिरकाल ग्रासलेल्या यात्रीला अचानक मार्ग सापडावा नि तो सुटून गृही परतावा, तसा माझा मन त्या हाकेने परत आला.

तिने सद्गदित स्वरात विचारले "देवराज, आपल्या सौममुद्रेवर एवढी चिंता कसली?" तिच्या आवाजात मृदू लय मला प्रकर्षानं जाणवला. पण तो सद्गत आवाज अनोळखा होता. माझी दृष्टी त्या आकृतीकडे वळली. मी चकित झालो. स्वर्गात आतापर्यंत कित्येक अप्सरा आहे, पण ती मला प्रथमच अनोळखी वाटली.

"यापूर्वी तुला कधी येथे पाहिलं नाहीस. कोण आहेस तू?"

"या नाजूक कळीची ओळख सर्वपरी 'रंभा' म्हणून विख्यात आहे देवराज!"

तिच्या बोलण्यातून अनिमिष भावनेचा स्पर्श होत होता. तिचं नाव रंभा होतं!

"मोक्षलोकातून स्वर्गलोकात एका विशिष्ट कार्यासाठी मी आली आहे देवराज! मदिरेची तृष्णा क्षमवण्यासाठी!"

मदिरा! या क्षणी मला सर्वाधिक आवश्यकता मदिरेची होती. पण मला काही तरी विलक्षण वाटू लागलं. ज्या वेळी त्या आकृतीने माझ्या कक्षात प्रवेश केला तेव्हा मी चिंतेत स्तब्ध होतो. तिने हाक मारल्यावर माझ्या मनाच्या समुद्राच्या तटाशी लहर घालणाऱ्या,

उफाळून सुटणाऱ्या भयस्त लाटी अचानक शांत झाल्या. ते क्वचितच! पण ते का, हे ठाऊक नव्हतं. कदाचित त्या आकृतीचं रूप माझ्या मनाच्या चिंतेला शांत करत होतं. मन हे असंच असतं, अगदी चंचल, अगदी शीतल. माझी दृष्टी क्वचित वर वळली, दोन क्षण मला काय झाले, काहीच कळले नाही. कदाचित, ते एक आकर्षण होतं. स्त्रीच्या सौंदर्यात माझं अंतर मोहून गेलं असावं. कदाचित, ते स्वप्न असावं. कदाचित,ते सत्य असावं! कदाचित ते एक भ्रमच असावं!!

ते जे काही असो, पण त्या विलक्षण भ्रमात मला काहीतरी अद्भुत, काहीतरी रम्य दिसलं होतं! होय, ती आकृतीच विलक्षण होती! अद्भुत होती! हिरे, माणिक, नीलम, पुखराज, गोमेद, प्रवाळ, धृतमणी, पारस, उपलक या सर्व रत्न-मोत्यांची मिश्रण करून ब्रह्मदेवाने एका नवीन कलाकृतीला जन्म दिले असावे, असे मला वाटले. समुद्रात दोन अमूल्य शिंपळे एकमेकांच्या आलिंगनात मग्न होऊन जसं अर्तभागी मोत जन्म देतात, तसे तिचे डोळे दिसत होते.

मी तिला विचारलं - “येथे का आलीस?”

त्या आकृतीने आपले मुख तिरीप खाली केले. तितर पक्ष्याच्या पंखाप्रमाणे रत्नत असलेली तिच्या डोळयांची नाजूक

पाखर अगदी निमुळती, अगदी क्वचित, खाली वळली. नजर झुकताच तिच्या गालांवर अगदी छोटेसे स्मित खिळून आले.

“ही रंभा केवळ आपली सेवा करायला आली आहे देवराज!”. ती अगदी लाजून बोलली. कापरीचं रेशीम धागं जसं पातळ होत जतं ना! तसे तिचे लाजक शब्द अखेरी अखेरीस पातळ होत गेले.

“मला कसली सेवा नको! मला एकांत हवा, अगदी एकांत! मला सोमरस हवा, तोच माझा साथी आहे! मला सोमरस दे!”

तिने केवळ मान हलवली. मुखातून एकही शब्द न पडता ती उठली नि सोमरसाचा चषक घ्यायला मेजपटाकडं वळली. चार पावलांच्या अंतरावर सोमरसाचा कुंद ठेवला होता. त्या आकृतीचे पाय ‘छन-छन’ नाद करीत दोन पावलं चालले तेव्हा त्या दुसऱ्या पावलापर्यंत त्या आकृतीची नजर माझ्या नजरेतच मिसळली होती. ढगांनी मंद मंद वायुलयीत झिरपावे तसे तिचे इवले पावलं, अगदी मंद, अगदी हळू हळू, चाळीचा सुंदर नाद करीत चालत होते. तेवढ्यात माझी नजर त्या आकृतीच्या पाठमोरीवर गेली. एक- एक पाऊलटीप जसजसं पुढं जात होतं, तशतशी तिची पाठमोरी कंबर, किंचित उजवं तर क्वचित डावं लचकं घेत होती. शेवटी तिने चषक हाती धरला. उजव्या हातात सोमकुंद धरून नि डाव्या हातातील

चषक धरून कुंदाची दिशा जराशी मुळती केली. आभाळातून चंद्ररसाच्या टिपांनी धरणीवर आलिंगन द्यावे तशी सोमरसाचे धारबिंदू टिप-टिप करत चषकाला आलिंगन देत होते. मद्याचा प्याला भरताना त्या आकृतीची नजर माझ्या नजरेत होती. एक पळ सुद्धा तिचे बिंद सरकले नाही. शेवटी प्याला भरून गेला.

सोमरसाचा चषक घेऊन ती माझ्या समीप येत होती. मी मद्याला आपल्या ओठांचे आलिंगन देण्याकरीता बेचैन झालो होतो. केव्हा केव्हा सोमरसाचा स्पर्श आपल्या ओठांना होईन नि त्या स्पर्शाच्या उन्मादात मी जगाशी विलीन होईन, सारी दुःख,सारी चिंता नाहीशी होईन, असे मला क्षण- क्षण वाटत होते. ते क्षण आले...

मी चषक हाती धरण्यास हात पुढं केला नि ...

"रंभे ..., चषक दे!"

"अ ....हं!!" ती खेळकर नादात उद्गारली. तिची मान नकारार्थी हल्ली, "या मदिरेचे उन्माद माझ्या नजरेहून अधिक आहे का देवराज?" ती अनिमिष स्वरात उद्गारली! मी स्तंबीत झालो. मी जे ऐकलं, तिने जे म्हटलं ते भ्रम नव्हते ना? की जणू आता मला भानच उरलं नव्हतं? हो, ते भानच असेल, ते एक भ्रमच असेल! इंद्र, भवितव्याच्या भीतीने तू वेडा तर नाही होत आहेस ना?

आधीच मन चिंतेने ग्रासून गेलं होतं नि त्यातही हे मला उलट-सुलट शब्द ऐकू येत होते! इंद्र, भानावर ये!! अशी खन्न शिलक मी स्वतःला बजावली. पण दुसऱ्याच क्षणी मला भ्रमाचा भ्रम झाला आहे हे स्पष्ट कळून गेले. मी आपली नजर पुन्हा त्या आकृतीकडे वळवली. त्यानंतर मला काय झाले हे मलाच माहित नाही. माझे डोळे त्या आकृतीत ठिपून गेले होते. माझे मन, माझे अंतर, माझी भावना मला काय संकेत देत आहे? ही …, ही आकृती काय करत आहे? मी या डोळ्यांत आपले भान का हरवतो आहे? मला हे नक्की काय होत आहे? जेव्हा आपले चित्त एखाद्या वस्तुत हरपून जाते तेव्हा त्यावेळचे भान, त्यावेळचे विचार देखील कुठेतरी हरपून जाते. हेच कदाचित आकर्षण तर नव्हे ना? मी कसं सांगू? तो काळ, ती वेळ, मी कसं सांगू? त्याला शब्द नाही. त्या भावनेला सांगण्याकरीता भाषा नाही. पण पुढे जे घडलं, जे झालं … ते ….
…, छे!!

४

"मी संतापेल त्याच्या आत मला तो चषक दे!!" असा उद्गार त्या क्षणी मला करायला हवा होता. पण मी ते करू शालको नाही. ते का, याच मलाच माहित. ती रात्र फार उदात्त होती. मद्यमेघातून मद्याची वृष्टी झाली, पण ते वृष्टी मेघातून नव्हे तर मेघरूपी डोळयातून! उन्मादाचं पूर आलं, पण ते नदीतून नव्हे तर अंगाच्या कणा-कणातुन!

तिच्या उजव्या हातात मद्याचे चषक होते. ती दोन पावलं दूर उभी होती, पण डोळे अगदी जवळ होते, माझ्या डोळयात मिसळले होते! पाण्याचे थेंब मातीशी मिसळतात ना! अगदी तसे! मग ती आकृती आपला डावा हात वर करू लागली. तो हात अगदी तिच्या उराला जाऊन निसटला. पृष्ठभागी गुंडाळलेल्या, मोरांपिसांच्या धाग्यांनी शिवलेल्या पट्टांकुशाच्या पेचात हाताची पातळ बोट रंध्र झाली होती! हळू हळू, अगदी हळू हळू ते अंकुश देहाच्या आलिंगनातुन सुटत होते! ती बोटं, एक-एक धागं खेचत होती. एका-एका पळात पट्टांकुशाची एक एक गुंडाळी निसटत होती! अन, अन मग शेवटी त्या अंकुशाचा आखरी धागा ही सुटून गेला!!

तो उदात्त, तो उन्माद! छे! शब्द अपूरे आहे! ती आकृती माझ्यापुढं अर्धनग्न उभी होती. अचानक सर्वत्र अंधार झाले.

कक्षाच्या ठिपकाष्टावर छोटीशी मोम आपोआप पेटून गेली. पलित्यांचा क्वचित प्रकाश उजळू लागला. त्या पिवळ्या प्रकाशात ती आकृती मला अशी दिसली जणू आसमंतातील निरभ ढगाआड लपलेलं चंद्र अर्धवट ददृष्टीस येतं नं! तसं! एका हातात मादक सोमरसाचा चषक धरलेला तर दुसऱ्या हातात छातीतून सरकावलेलं अंकुश होतं! ते तिने लुळकपणे बोटांच्या मुठीतून खाली सोडून दिलं. आता ती आकृती आणखीनच मादक वाटू लागली!

उजव्या हातात धरलेलं चषक तिने वर केलं. क्वचित वेळापूर्वी ती आकृती कुंदातुन मद्याची धार चषकात ओतत होती. नि आता तेच मद्य त्या चषकातून सुटून तिच्या दुधात जाऊन घट्ट मिसळत होते. तिची मुद्रा राजहंसाच्या मुद्रेसारखी भासत होती! कमरेच्या बाहुतून किंच वाकलेली आकृती, डोळयात मादकतेचं अंजण घातलेली नि कसं ते सोमरसाची धार आपल्या दुधाच्या धारेत मिसळणारी ती रंभा! छे! अंकुशाने मोकळं केलेलं अंग मादकतेत भिजून चिंब झालं! चषकात ओतलेलं रस संपलं हे बघताच तिने चषक दूर निसकून दिला! ती आकृती समोर येऊ लागली! ते अगदी जवळ अली, अगदी जवळ! ते काही तरी बोलली, अगदी पातळ स्वरात,

“या नवीन सोमरसाचं स्वाद घ्याल ना देवराज?”

मग जे झालं, ते मी सांगू तरी कसं? ते वाक्य ऐकताच एक जब्र स्फुर माझ्या देहात शिरला! मी लगेच तिला माझ्या बाहूत घट्ट धरले! अगदी घट्ट! दोन नद्यांचं संगम व्हावं तसं त्या दोन आकृतींचं संगम झालं. ओठांत ओठ मिसळले, देहात देह मिसळले! अग्नित चुंबनांची वृष्टी झाली. मी तिच्या रुधिरास मग्न झालो. त्या नवीन सोमरसाच्या समुद्रात बुडून गेलो! ते प्रणयेचे समुद्र होते! त्यातील खळखळणारी लाटी! तो थंड पाण्याचा स्पर्श! तो एकांत प्रवाह! तो एकांत काळ! त्या महासागरात प्रवास करणारे केवळ ते दोन जीव! प्रीतीच्या सागरात भ्रमण करता करता जणू या जगाशी विलीन होऊन गेले!

५

ते जे घडलं ते कदाचित रोज घडत असेल! असेल काय, घडतंच! ब्रह्मदेवाने सृष्टीच्या रचनेत दोन वेगवेगळी जीवं का निर्माण केली असावी? का त्यांनी स्त्री आणि पुरुष यांना दोन वेगवेगळे अंग दिले? का त्या दोन परस्पर अंगांचा एकमेकांत मिलन होतो? याचं कारण आहे 'प्रीती'! आकाशातील दोन ढगांचं मिलन, भुवरील दोन नद्यांचं संगम, हे प्रीती नाही काय? उमाशंकराने हे अनंत सौंदर्याने नटलेलं स्वर्ग सोडून त्यांच्या सहवासाचं ठिकाण कैलासच का निवडला? कारण त्यांना एकांत हवा! त्या एकांताला कोणीही भंग करू नये, ते दोघे जेव्हा एक-मेकांच्या आलिंगनात विरून जाईल तेव्हा त्यांना कोणी हाक मारू नये म्हणून! जगाच्या दृष्टीहून लपून जाऊन, केवळ प्रेम करावे नि त्या प्रेमात नेहमीसाठी बुडून जावे म्हणून!

त्या रात्री मी खूप चिंताग्रस्त हितो. शुक्राचार्यांच्या तपस्याला दहा वर्ष पूर्ण झाले होते. या दहा वर्षात मी त्यांची तपश्चर्या भंग करण्याचा खरपूस प्रयत्न केला. पण अखेरीस महादेवांनी मला खल पाडली. त्यांचा माझ्यावरील क्रोध स्पष्ट मला भवितव्यचं विषण्ण रूप दाखवत होतं! मी विश्रुब्ध झालो होतो. संध्यछायेत प्राजक्त उमललेलं कमळाचं फुल जसं कोमेजून जाते, तसं माझं जीवनही

त्या विश्र पुष्पप्रमाणे उद्या कोमेजून जाईल हे विचार पळा पळाला - क्षणा क्षणाला मला सलत होते. आपली प्रिय वस्तू कुण्या नवडतीच्या समीप करून देणे हे कोणत्या व्यक्तीला आवडेल? पण आता विचार करूनही काय उपयोग? माझा स्वर्ग दूर जाणार याची मला खात्री झाली होती. शुक्राचार्यांचं तप भंग करणं अशक्य होतं. सर्व प्रयत्न विफल झाले होते.

ध्वस्त अवस्थेत प्रक्षुब्ध मनाने मी एका अभ्रशील पाषाणाप्रमाणे स्तब्ध बसलो होतो. त्याच अचानक एक सुंदर आकृती माझ्या समोर अली. तिच्या सहवासात या इंद्राला सर्व सर्व विसर पडले. ती चिंता, ते भय, ते भवितव्य, सारं सारं एका क्षणात स्वैर भ्रमण करणाऱ्या विदीर्ण पर्णाप्रमाणं कुठच्या कुठं उडून गेलं! उरलं ते फक्त- सुख! केवळ सुख! ब्रह्मनंद!!

पण हे का झालं असावं? प्रीती खरोखरच एवढी सुखदायी असते का? कि प्राणयेच्या विश्वात केवळ सुखची क्षणं विसावलेली असतात? सृष्टिकर्त्याने किती अद्भुत रूप त्याच्या रचनेत चित्रित केले आहे! अन त्यातील प्रणया म्हणजे त्या चित्रातला भरलेला सर्वात सुंदर रंग! नि या रंगला खरं वात्सल्य प्राप्त करून देणारी कळी म्हणजे -'स्त्री '!

प्रणयेच्या विश्वात अकल्पनीय सुख मिळते पण ते कुणापायी?

स्त्रीपायी!!

या जगात स्त्री नसती तर जगात कोणते सुख असते?

कोणतेच नाही! सुगंध नसलेल्या फुलाचा काय उपायोग? जर ती आपल्या रसगंधातून मनाला तृप्तीची अंकुटी नाही देऊ शकत! अशी फुलं जरी नुकतीच उमलली तरी ती कोमेजलेली वाटतात. पण ज्या पुष्पात सुगंध असतो ते पुष्प आपल्या गंधाच्या सामर्थ्यावर सर्वांचे लक्ष वेधून घेते. अश्या फुलांच्या सहवासात कुणाला आनंद होणार नाही?

स्त्रीचं सहवासही या फुलांप्रमाणेच असते. त्या सहवासात मनाचे सारे मळभ झटकले जाते! सुगंध! सु...सुगंध! आकर्षण! पुष्प! सौंदर्य! माझ्या मनात एक विलक्षण टिटवी भिरभिरू लागली! माझ्या मनाला काही तरी सापडले! हो, मला मार्ग सापडला होता! शुक्राचार्यांची तपश्चर्या कशी भंग करायची याचा उपाय मला मिळाला होता! पण त्या मार्गात खल होते, विविध उलट्या-सुलट्या प्रश्नांची पाषाणे बाध्य होती. पण ते मार्ग देखील एकमात्र होते! मी स्वतःशी बोलू लागलो, स्वतःला प्रश्न करू लागलो -

‘इंद्र! काय हे योग्य आहे?’

‘का नाही? यात दोष कुठलं?’

‘पण..जग काय म्हणेल?’

‘जग! हं! जग! तू विसरलास? अरे या जगाचा राजा आहेस तू! तुला जगाचा पुळका? अन त्यात पुळका येण्यासारखं काय आहे इंद्र? वेड्या, जग काय म्हणेल याच विचारात थांबशील तर पुढं पश्चात्ताप होईल! रे इंद्र, तू देवराज आहेस! तू काय असाच या इंद्रपदावर विराजमान झाला काय? कितीतरी छळ, कितीतरी बुद्धी कौशलाने तू या सिंहासनावर आरूढ झालास! मग आज त्या सिंहासनावर आपत्ती येण्याची वेळ अली आहे नि तू काहीच नाही करावे हे इंद्राला शोभेल पण देवराजाला नाही! उठ देवराज, प्रयत्न कर!!”

‘हो! मी देवराज आहो! नि राहणार! सदैव राहणार! जिथे बळ विफल होतो तिथे बुद्धी वापरावी लागते! पण जिथे बुद्धीही विफल होते तिथे …? …. स्त्री!”

## ६

मी रंभेला बोलावून घेतलं. कारण आता मी माझा सर्वात मोठा डाव खेळणार होतो!

“देवराज! काय सेवा करू?” ते उद्गारली.

“आम्हास एक प्रश्नाचं उत्तर हवं आहे रंभे! देशील?”

“आज्ञा!”

“या विश्वकर्त्याची सर्वात सुरम्य रचना कोणती?”

ती स्तब्ध झाली. कदाचित ती विचारात विरून गेली असावी. तिने दोन क्षण थांबून उत्तर दिले -

“प्रीती!”

“प्रीतीच का?”

“याचं कारण आपणास काष्ठकोप्त ठाऊक आहे देवराज!”

“प्रीतीचं कारण?”

“अतृप्ती”

“समाधान?”

“प्रणया.”

“प्रणयेचं कारण?”

“आकर्षण.”

“आकर्षणाचं कारण?”

“सौंदर्य!”

“सौंदर्येचं कारण?”

“स्त्री!”

“स्त्रीचं कारण?”

“पुरुष!”

“अन पुरुषाचं?”

“स्त्री!”

“या कारणाचं सबब?”

“सृष्टीची रचना!!”

“सुलभ! अगदी सुंदर उत्तर!,” मी उद्गारलो, “रंभे! पुष्प किती?”

“एक!”

“रूपं?”

“अनेक.”

“वैशिष्ट्य?”

“गंध!”

“गंध किती?”

“एक.”

“रूपे?”

“अनेक.”

“कोणती?”

“अमीय -विषल.”

“अमीय?”

“अमृत.”

“विषल?”

“विष!”

“ओळख?”

“अदृश्य.”

“का?”

“रचना!”

“रंभे! शत्रू कोण?”

“एक विषच!”

“त्याचा शत्रू?”

“अमृत!”

“उपाय काय?”

“बळ.”

“जर विफल?”

“तर छळ!”

“छळ काय आहे?”

“गुण!”

“कसा?”

“विलक्षण!”

“कोणाचा?”

“अंतरचा.”

“कारण?”

“रचना!”

“रंभे,अमृत काय आहे?”

“कल्प शास्त्र!”

“अन विष?”

“शस्त्र!”

“विष कसा दिसावा?”

“अमीय.”

“पण कसा असावा?”

“विषल!”

“या शस्त्राला नाव कोणते?”

“पुष्प!”

“हे शस्त्र कोणतं, बळ, की छळ?”

“बळ!”

“कशाचं?”

“सौंदर्य!”

७

संवाद नोकावर टिपून गेला. कोणतं ही अनामिक कार्य जर दुसऱ्याहून काढून घ्याचं असेल तर ‘शब्द प्रहार’ हा सर्वात उन्मादक उपाय असतो. इंद्र आणि रंभेचं हे संवाद एखादा इतिहासकार शोधून काढेल नि त्याला नवीन काल्पनिक रूप देऊन जगासमोर टिपेल.मग जग या इंद्राला छळी, दुर्बल नि चत्रा म्हणून त्याची विटंबना करेल. शेवटी हे जग केवळ व्यक्तीचं अमर्श समजतात, मन नाही. व्यक्तीचं जसं मन असते, तसंच त्याचं अमर्ष असतं हे मला अजिबात पटत नाही. का, कारण काही काही गोष्टी मनाच्या विरुद्ध कराव्या लागतात. परिस्थिती आपल्या जीवनाशी विरुद्ध खेळ नाही खेळत का? मग त्याला उत्तर त्याच्याच भाषेत का देऊ नये? यात चुकीचं काय? मग मन नसूनही निवार्य गोष्टी अनिवार्य कराव्या लागतात. नको त्या वाट्याला पावलं टाकावी लागतात! एकदा का त्या वाटेवर पावलं उमटली की सारं जग आपल्या अमर्शाला लांछन म्हणून विटंबन करतं. कुकर्म काण्याची वेळ ये काळामुळेच येते. परिस्थितिच तो कुंभार होय जो मनाच्या घड्याला वाटेल त्या आकारात घडवते. मग माणूस लांछनी आहे, तो कुकर्मी आहे कारण त्याचं मन योग्य नाही म्हणून की परिस्थिती

योग्य नाही म्हणून? मी असं का बोललो हे कदाचित तुम्हाला कळलं नसेल. मी केवळ माझा विचार स्पष्ट केला, आणखी काही नाही. जर परिस्तिथीचे धागे माझ्या बोटांत असते तर कदाचित मी असं बोललो नसतो.

माझ्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर रंभेने अचूक दिलं होतं. पण त्या साऱ्या प्रश्नांमागील तात्पर्य तिला कळला नाही, हे मला ठाऊक होतं. तिने मला प्रश्न केला

“देवराज, या प्रश्नांचं तात्पर्य काय?”

“तात्पर्य मोठा विलक्षण आहे रंभे!” मी जरा हसून उद्गारलो, “फार विलक्षण!” “रंभे! एक गोष्ट ध्यानी ठेव.कधी कधी मुखातून उद्गारलेले शब्द खोलवर रुतून जातात. पण त्यामागचं कारण ऐकणाऱ्याने शोधलं पाहिजे.” मी विक्षिप्त स्वरात बोललो. ती गोंधळून गेली. जेव्हा व्यक्ती अपूर्ण गोष्ट सांगून आपल्याला सज्ज करतो तेव्हा मनाची स्थिती फारच व्यग्र होते.

“देवराज, तुमचे उद्गार देखील आम्हास विलक्षण वाटू लागले आहे. मला स्पष्ट सांगा!” ती म्हणाली.

मी विक्षुप्त स्वरात बोलू लागलो -

“रंभे! या देवराज इंद्रासाठी तुला एक कार्य करायचं आहे. आता तूच एक शेवटचं पर्याय शिल्लक आहे. शुक्राचार्यांची तपश्चर्या तूच भंग करू शकते!”

“काय?” आश्चर्याची तिरीप चोहोबाजू फिरली.

“होय रंभे! तूच! त्रिलोकात साक्षात चंद्र हि लाजेल असे अदभुत सौंदर्य विश्वकर्त्याने तुला दिले आहे. पाचू माणिक रत्नांचा पुंजकाही तुझ्या दृष्टीसमोर विलम्य आहे. आकाशातील लपलपणारे चांदणे देखील तुझ्या देहवृष्टीस नीरव वाटते. तुझं सामर्थ्य तुझ्या मादक डोळयात आहे, तुझ्या अंग- अंगातील लचके घेणाऱ्या कमरबंधात आहे! तुझे रोम रोम वात्सल्यरुपी गंधात मिसळले आहे. अंगाचा कण-कण उनमत्त सागरात नि प्रीतीच्या लाटांत निथळला आहे रंभे! जे कार्य शस्त्र करू शकत नाही, ते सौंदर्य करतं! जा रंभे, खाली धरतीलोकात प्रवेश घे. शुक्राचार्यांच्या भोवती उन्मत्त नृत्य कर. तुझ्या सौंदर्याचं सामर्थ्य दाखव!”

“देवराज! हे योग्य नाही. जग काय म्हणेल? देवांच्या राज्याने -साक्षात वज्रधारी इंद्राने त्याच्या रक्षणार्थ एका अप्सरेचा वापर केला? यास आपण किती दुर्बल आहो, हे सिद्ध नाही होत?”

तिचे हे उद्गार ऐकताच मला संताप आले! खूप खूप संताप आले! मी आणि दुर्बल? हा पराक्रमी इंद्र दुर्बल? “तुझ्या जिभेवर

ताबा राहिला की नाही? की तुला वेड लागले आहे?" अशे उद्गार माझ्या जिभेच्या अग्रभागाच्या टोकावर आले पण ते मुखातून बाहेर पडले नाही!

"रंभे! तू या इंद्राला दुर्बल म्हणती आहेस! साक्षात देवराजाला?" खणखणत्या तप्त भृशुंडीच्या प्रहाराने मला ओरडून सांगावेसे वाटले. पण बुद्धीकौशलाचा सर्वात महत्त्वाचा डाव म्हणजे स्वतःच्या मुखावर नियंत्रण ठेवणं! मन आणि मुख यांचा संबंध जुळला की आपले सर्व डाव विफल जाणे अनिवार्य आहे! ही वेळ आता संतापण्याची नव्हती.

"दुर्बल? रंभे, यात दुर्बलता कसली?" मी प्रश्नार्थक स्वरात प्रश्न केला. 'दुर्बल' हा तिचा शब्द मला आतल्या आत रुदन देत होता.मनाच्या एका कोपऱ्याने हे हि मंजूर केले होते की इंद्र! तू दुर्बल आहेस! पण मी हे जगाला का सांगावे?

"महाभारतात पितामह भीष्माचं वध शिकंढीचा बळ घेऊन नव्हता केला गेला काय? त्या युद्धात तर स्वयं नारायण होते! मग त्यांनी या कुकर्माला साथ का दिली? बोल रंभे, बोल?"

ती विचारात आर्त झाली. मी म्हटले -

"विचार कर अप्सरे, यात अयोग्य काय? तुला काय मी तुझ्या सौंदर्याने कुणाचा जीव घ्यास आज्ञा केली? उलट मी तर आपल्या

शत्रूला सुख देऊन निमग्न करतोय. प्रहार करतोय पण बाणाचा नसून तर ते मादकतेचा! व्रण घालतोय पण ते रक्ताचा नसून तर ते प्रीतीचा! यात छळ कसला? दुर्बलता कसली? मग जग अनच्छ विचार का करेल? उलट विटंबना होईल ती शत्रूची! ऋषी मुनी मोठं जगाला सांगत असतात आम्ही त्यागी अहो. मोह, माया,सुख, ऐश्वर्य हे माणसाचे शत्रू आहे. आम्ही संसाराच्या पायविटांवरून सन्यास घेतला. आम्ही शरीराचा त्याग केला! अशी मोठी उंच उंच वचने ते जगाला सांगत फिरतात. शरीराचा त्याग म्हणजे जीवन तरी कसं? जर तुम्ही शरीराचा त्याग करता तर मग भोजन का करता? हात - पाय का मारता? रंभे! ही सर्व एक ढोंग कल्पना आहे! केवळ जगाच्या डोळ्यांभोवती झाकलेली एक चादर आहे! हे समझ रंभे समझ!!" मला हे प्रत्यक्ष माहित होतं की मी काय बोलतो आहे. पण मी त्यावेळी स्वतःला रोधु शकलो नाही. माझ्या डोळ्यांपुढे केवळ माझं स्वर्ग होतं, आणखी काहीच नाही!

दोन क्षण विचारमग्न होऊन ती म्हणाली -

"नि जर शुक्राचार्यांनी क्रोध धरून मला शाप दिले तर? तुम्हाला शाप दिले तर?"

शाप! हे नाव ऐकताच एक विषण्ण झळकीळी माझ्या अंतर मुद्रेवर उठून सुटली. शाप! जर शुक्राचार्यांनी क्रोधात येऊन मला

शाप दिला तर? हे प्रश्न क्षणिक मला भयग्रस्त करून गेले;पण पुढच्याच क्षणी मला त्याचं उत्तरही सापडून गेलं! मी क्वचित हास्य स्वरात उद्गारलो -

"शाप! ते अशक्य आहे! जर शुक्राचार्य क्रोधितही झाले नि कटुशब्द त्यांच्या जिभेच्या टोकावरही आले तरी ते मुखातून बाहेर नाही येईल! त्या कटू शब्दप्रहाराची ढालही तुच असशील!"

"तात्पर्य?"

"तुला त्यांना हवं ते सुख द्यावं लागेल!" हे शब्द मी कसे बोललो, मलाच ठाऊक नाही. रंभा डोळे विस्फारून माझ्याकडे पाहत राहिली. तिचं अंग -त्या वाक्याने शहारून गेलं होतं. ती सुन्न झाली होती. अत्युग्रचकित डोळयांनी ती मला बघत राहिली! मी खरंच देवराज होतो काय? मग मी असं वाक्य का बोलून गेलो? स्वार्थापायी? सुखाच्या लालसापायी? की केवळ स्वतःसाठी? कधी कधी गोष्टी मनाच्या विरुद्ध हि कराव्या लागतात! नियतीनं माझ्यावर विरुद्ध प्रहार नाही केला काय? माझं हक्क माझ्याहून हिसकावून घेण्यासाठी तिने दैत्यगुरूचं बळ घेऊन हे क्षम्य नव्हतं रचलं काय? नियती दुसऱ्यांच्या जीवनाशी वाटेल ते करते, तिला कोणाचा थाम नाही, कुणाचं भय नाही, कुणाचा विचारही नाही. मग मी का मागे पुढे विचार करावा? मी माझ्याबाजून योग्य होतो.

शुक्राचार्य रंभेच्या मोहात पडून प्राणयेच्च्या महासागरात बुडून जाईल. मग त्यांची घोर तपश्चर्या देखील भंग होऊन जाईल! एकदा का तपश्चर्या भंग झाली की त्यांना कुठलं ही वरदान मिळणं अशक्य! हि नीती एक प्रहार आहे! या बुद्धिकौशल इंद्राने केलेला प्रहार आहे! पण तो वज्राचा नाही तर प्रीतीचा! बाणाचा नाही तर अंगातील कणा-कणांचा! सुखाचा! प्रणयेचा! मी काय शत्रूला जिवंत मारतोय? त्याचं रक्त पितोय? उलट मी तर आपल्या शत्रूला आनंद देतोय! ब्रह्मानंद देतोय! कारण शत्रूला सुख देऊनही विफल करता येतं!

## ८

"देवराज?" आश्चर्येच्या संतापात हा प्राणघेई प्रश्न शयन कक्षाच्या चोह भिंतींवर पाषाण कोसळावा तसा कोसळला! अचंब प्रश्नार्थी मुद्रेच्या स्वरात ती म्हणाली -

"देवराज! आपली बुद्धी लालसेच्या विचाराने पातळाच्या गर्तेत जाऊन फसली की काय?? केवळ या स्वर्गाच्या सुखासाठी मी आपली आबरू एका संन्याशाच्या घरी जाऊन विकू? त्याच्या अंगाला अंग लावून प्रणया करू? हे कुकर्म अप्सरांच्या पवित्रतेला कलंकाचं व्रण नाही लावणार काय? सारं जग आम्हाला व्यभिचारी म्हणेल! वैश्याच्या नजरेने आम्हावरी थुंकन! देवराज, हा विचार तरी तुम्ही कसं करू शकता?"

तिच्या प्रश्नाने माझे अंतर सुन्न झाले. पण त्या क्षणी मला कशाचाच भान उरला नव्हता! माझ्या डोळयासमोर केवळ माझं भवितव्य होतं, आणखी काही नाही! "तुम्हा अप्सरांचा चारित्र्य माझ्या स्वर्गाहून अधिक मूल्यवान आहे का?" हा प्रश्न माझ्या मनात उठला! हो, उठला! यात काय चुकीचं आहे? नि मुख्य म्हणजे अप्सरांचा जन्म केवळ जीवांना सुख देण्याकरिता झाला आहे. त्यांची जीवन रचनाच अशी आहे. शेवटी या जगातील विश्वकर्त्याने

'सौंदर्य' का बनवलं? आणि ते सौंदर्य केवळ अप्सरांच्या देहातच का अभूर्त केलं? कारण एकच- त्यांची रचना! मग तरीही ही वेडी अप्सरा का मला अशे अर्थहीन आणि थुर्कट प्रश्न विचारती आहे? 'व्यभिचार' हेच या अप्सरांचे पावित्र्य आहे! 'प्रणया' हेच त्यांचे प्राण आहे! हे सत्य मला तिला गदागदा हलवून सांगावेसे वाटले, पण प्रश्न मात्र तोच राहिला - माझे बुद्धी कौशल! मग पुढचे शब्द माझ्या मुखाच्या कोणत्या उग्रातून वज्राप्रमाणे बाहेर सुटले हे मला माहित नाही, अजिबात माहित नाही.

"व्यभिचार!" मी उद्देशून बोललो "व्यभिचार? रंभे … कसला व्यभिचार? कसा? प्रणया तर विश्वकर्त्याची देण आहे, हा व्यभिचार कसला?" माझे प्रत्येक शब्द नुकील्या बाणाप्रमाणे मुखाच्या तूणीरातुन सर्र सुटत होते. "रंभे,विचार कर. शरीर सुखाला 'व्यभिचार' म्हणून कुलंक करणं, हेच जर परमेश्वराची इच्छा असती तर त्याने या देहाला इंद्रिये का दिले असते? शरीराला अतृप्तीची जाणीव व्हावी म्हणून हे चंचल मन का दिले असते? सांग रंभे सांग?"

"पण जग …?"

"जगाचं का? जग हे मूर्ख असतं रंभे! नि तू जगाचा विचार का कारती आहेस? अप्सरेचा जन्म कशासाठी झाला आहे सांग! सुख

देण्यासाठी! नि जरा विचार कर. स्वतःला मोहत्यागी, सुखत्यागी म्हणून घेणारे हे ऋषी मुनी जेव्हा एका अप्सरेच्या मोहात पडून संभोगमग्न होईल तेव्हा त्यांचं ढोंग संपूर्ण विश्वासमोर उलघं होईल! मग कलंक कोणावर लागेल? जग कोणाला व्यभिचारी म्हणेल? विचार कर रंभे विचार कर. ज्या कर्मासाठी सोमकुंडातून अप्सरांची उत्पत्ती झाली ते केवळ यासाठीच!"

जलाच्या टपटपांप्रमाणे संवाद वाढत होता. माझ्या मुखातून बाहेर पडणारे प्रत्येक शब केवळ माझ्या स्वार्थाच्या उलमिश्रणात मिसळून जाऊन बाहेर येत होते. याची मला त्यावेळी पूर्णपाणे प्रत्यक्ष जाणीव होती. पण माझ्या स्वार्थातही सत्य दडलेलं नव्हतं काय? तिचा संताप पालता होत गेला. तिची गूढ विचारात मग्न झालेली मुखदृष्टी 'तुझ्या शब्दांचे बाण योग्य जागेवर टिपले इंद्र!' हे सांगत होती. आता मन हळू हळू चिंतामुक्त होऊ लागले.

मी तिच्या चकित मुद्रेकडे पाहिलं. रंभा विचारात मग्न झाली होती. माझी योजना सफल झाली असं मला वाटू लागलं. ती माझ्या शब्दांच्या जाळयात पूर्णपणे अडकून गेली होती. जाळयात अडकलेलं मांस हे मृतच असेल याची आधीच शाश्वती घेऊन आपण सफल झालो, या वृत्तीचा विचार नेहमी मूर्ख करत असतात.. बुद्धी कौशल सदैव पुष्पातून विष घालते याची या इंद्राला काष्ठाकोष्ठ

जाणीव आहे. रंभा आता गूढ विचारात निमग्न झाली होती. तिचे मन ‘हे योग्य की अयोग्य?’ म्हणून गर्त आवेश करत आहे याची मला अवगती होती. मग मी लगेच आपला पुढचा डाव खेळला नि अंतर मनावर गणाचा घण रुतून जाईल असा एक जळजळीत कटाक्ष टाकला -

“जिला आपल्या सौंदर्यावर अहं नाही, ती **अप्सरा** कसली?”

# भाग २ –

# रंभा

# १

काय! मी,.... मी... सुंदर नाही? माझ्यात अहं नाही असं देवराजांना का वाटतं? काय अल्प आहे माझ्यात? सौंदर्य? वात्सल्य? रूप? काय आहे?

काहीच नाही! मी सर्वस्व आहे. चंद्राचीही तृषा माझ्या मुखसौंदर्याला पाहून लाजेल असं रूप या रंभेच्या अंग-अंगात मिसळलं आहे. या स्वर्गलोकाची सर्वात सुरम्य अप्सरा आहे मी. देव, सुर, असुर माझा सहवास मिळावा म्हणून आजन्म तळपतात. आजवरी कित्येक महाकवींनी माझ्या सौंदर्यावर किती तरी अलम्य काव्ये रचले.हस्तिनापूरनरेश राजा नहुषाने माझा सुख मिळावा म्हणून साक्षात देवराजांशी युद्ध केले! माणिक, मोती, नीलम, पुखराज,गोमद,प्रवाळ,पारस, उपलक या सर्व रत्नांचा संगमही माझ्या डोळयांच्या पापण्यास फिके वाटते. त्यांची माझ्याशी तुलना तर फारच दूर! नि देवराज मला म्हणतात कि मी अप्सरा नाही! माझ्यात सौंदर्य नाही! छे! देवराजांना वेड लागलंय!

ज्यावेळी ‘‘शुक्राचार्यांना हवं ते तुला त्यांना द्यावं लागेल’’ हे उद्गार देवराजांच्या मुखातून बाहेर पडताच माझ्या कानी शिरले तेव्हा मी चक्क सुन्न झाले! आपल्या समोर देवराज आहे की एक

अमयवैश्य पुरुष उभा आहे हेच मला कळेनासे झाले. त्या व्यभिचाराचा विचार करताच मी चोहबिंद शहारून गेले! मला स्वतःच्या कानांवर विश्वास होईना. कामुकनृत्य करून, प्रणयेची आस डोळयात धरून नि आपल्या सौंदर्याच्या बळावर एका ध्यानस्त ऋषीला त्याचं तप भंग करणास उत्र्त करणं हे योग्य आहे की नाही या विचारांची गुंतागुन माझ्या मनाला पळ पळ कवलत होती. पण अखेरीस देवराजांनी मला जे पटवून दिले त्यात मला क्वचित पण अर्थ दिसू लागले. कोंदटलेल्या विचारांच्या धाग्यात एक धागा असा वर निघाला ज्याने माझे अंतःकरण किंचित पण गूढ परिवर्तित केले. यज्ञात हविर्द्रव्यांच्या स्वाहेमुळे शिग्न चतुर्दिक वायू कणात वलय पावते नि सरळ आकाशात झेप घेते.पण त्या वायुकणांत मिसळलेल्या शिग्नांत एक शिग्कण अशी असते जी अदृश्य रूपाने दिशा बदलून कुठच्या कुठे विलीन होते. कदाचित ते जगाच्या पलीकडे जात असेल! कदाचित ते स्वैर भ्रमण करत असेल! कदाचित ते अदृश्य राहून नेहेमीसाठी लोप पावत असेल! तात्पर्य असा आहे की एका जीवाचे मन सुद्धा असेच नाही का? उसळत्या हविर्द्रव्यरुपी अकल्प बोलण्याने मनाच्या शांत यज्ञकुंडात विचारांची तळतळी उठते. ते ऐकताच आपण अकल्प बोलण्याला सार्थ ताकीद करतो. जे नाही पटलं, जे अयोग्य आहे त्याच्या विचार जास्त का करावा? सरळ विरुद्ध बोलून त्याला मुठीत कुठायचं

अशीच मनाची क्रिया असते. आपले निशम विचार म्हणजेच उर्त उडणाऱ्या चतुर्दिकातील शिग्नकण आहे. त्यातील विचारांची रांग एकरूप होऊन सरळ वलयात मिसळून जाते. पण त्याच विचाररुपी शिग्नकणात एक कण असा असतो जो वेगळा भ्रमण करायला बघतो, म्हणजेच एक विचार कधी कधी अयोग्य गोष्टीला देखील सार्थ करण्याचा विचार करतो. सरळ प्रश्नात मी माझं उदाहरण देते. जेव्हा इंद्रांनी मला “शुक्राचार्यांना हवं ते दे” हा वाक्य उद्गारला तेव्हा मी चक्क झाले होते. आमचा संवाद वाढत होता. बोलणं हे केवळ इंद्र आणि रंभेच्या मधात नव्हतं, अपितु खरा संवाद तर त्या रंभेच्या अंतःकरणाशी होता. शेवटी देवराजांनी माझी समजूत काढण्यासाठी जे जे वाक्य योचिले त्याने न कळता का होईना, माझं मन त्या गोष्टीला ‘योग्य’ म्हणून विचार करू लागला. अप्सरांचा जन्म शेवटी कशासाठी झाला आहे? नि जग मला का व्यभिचारी म्हणेल? शेवटी जग हे आंधळं असतं हेच न! ते देवराज आहे, स्वर्गादिपती आहे. त्यांना जगाचा दृष्टिकोन ठाऊक असेलच ना? त्यांच्या बोलण्यात एका दिशेनं सत्यता तर होतीच ना! हे विचारच ते शिग्नकण होते!

## २

मन प्रत्येकाला असतो. पण त्या मनाची पूर्णपणे उघळण करणं हे जगातील सर्वात कठीण कार्य असतो. पण आज मी ते करणार! मग जग मला काहीही म्हणो, मला पर्वा नाही. हे व्यक्त करताना एक विलक्षण भीती मला वाटत आहे. कदाचित, माझं बोलणं ऐकून काही लोकं माझा जळजळ तिरस्कार करतील. हे ऐकून माझ्या अमर्शाला विविध कटू नावं देतील. पण ..., पण तरीही मला माझे मन उघडे करायचे आहे!

“तुला शुक्राचार्यांना हवं ते द्यावं लागेल! हे व्यभिचार कसलं? हे तर विश्वाची रचना आहे! रंभे, जग तर वेड आहे! शेवटी या जगात अप्सरांचा जन्म कशासाठी झाला?” हे देवराजांचे वाक्य सतत माझ्या मनात घरघर चक्राप्रमाणे फिरत होते. योग्य की अयोग्य या गुंतागुंतीच्या विचारात एक विचित्र विचार क्षणिक माझ्या मस्तकी फिरला -

“हो न, शेवटी या जगात अप्सरांचा जन्म कशासाठी झाला? रंभे, प्रत्येक विचारला दोन बाजू असते. गुंतागुंतीचे सहस्त्र धागे सदैव त्याच दिशेकडे मुळतात ज्या ठिकाणाला मन योग्य समझतो. पण त्या सहस्त्र धाग्यांत एक धागा असा असतो जो विचारांच्या

पलीकडे जाण्यास बघतो. आणि इंद्र जे बोलत आहे त्यात जास्त अयोग्य असं काय? आपण कुठे मृत्यूच्या मुखात पडायला जात अहो काय? नाही ना! अरे उलट ते तर स्वर्गावरूनही सुरम्य असं विश्व राहील! प्रणयेचं विश्व! ब्रह्मानंद! आणि जग मला का व्यभिचारी म्हणेल? शक्यच नाही. रंभे! आपल्या देहात तळमळणारी हि अतृप्ती, आज पृथीच्या तळाशी जाऊन तृप्त करण्याचा योग्य येत आहे आणि तू वेड्याप्रमाणे जगाचा विचार करती आहेस? जा रंभे, पृथ्वीवर जा! मग तिथून सुखाच्या महासागरात जा!”

## ३

“जिला आपल्या सौंदर्याचं अहं नाही ती अप्सरा कसली?”

हे उग्र उद्गार ऐकताच मला अदम्य क्रोध आले. माझं उर तीळतीळ तुटल्यासारखं झालं! कारण तो शदांचा घाव माझ्या काळजाला बाणाच्या टोकाप्रमाणे रुतून गेला! मन दुखावले, फार दुखावले! त्या क्षणी माझी अवस्था काय होती, कशी होती हे मी सांगू तरी कसं?

ते वाक्य ऐकताच एका तळाशी मन दुखावले तर दुसऱ्या तळाशी क्रोधाच्या लाटी उफाळून आल्या! आता मला उत्तर देणं अनिवार्य होतं. मी ते दिलं! मनात लागलेल्या जखमेच्या गर्त आवेशात येऊन की क्रोधाच्या आवेशात येऊन की त्या विलक्षण विचारात येऊन मी उत्तर दिले हे मला माहित नाही. मी योग्य केलं की चूक केली, ते निर्णय उचित होते की अनुचित होते, हे सुद्धा मला माहित नाही. पण एक गोष्ट मात्र खरी होती! माझ्या उत्तराने इंद्राचा आनंद गगनात मावेनासा झाला होता!

# भाग 3 –

# शुक्र

१

“ॐ नमः शिवाय:

ॐ नमः शिवाय:

ॐ नमः शिवाय:

हे शंकरा! हे महेश्वरा! हे अर्कादिपती! तुझा एक परम भक्त तुला स्मरण करत आहे, तुला नमन करत आहे. माझे मन, माझे चित्त, माझं जीवन सर्व सर्व तुझ्या चरणी मी अर्पण करतो. हे महादेव, तूच माझं जीवन आहे. तुझ्या शरणात मी धन्य अहे. तुझी भक्ती करून मला जगाचं सर्व सुख मिळते. तुझ्या या भव्य रचनेत मी तर एक लहानसा जीव अहो. हा जीव आज तुझं ह्दियपासून स्मरण करते. ये शंकरा, मला दर्शन दे. माझे नयन तुझं दिव्य रूप बघण्यास आतुर झाले आहे. हे नटेश्वर, या तुझ्या भक्ताला तुझं दर्शन दे!

ॐ नमः शिवाय:

ॐ नमः शिवाय: ॥”

“समं, दमं, युग, मथं, शीत, द्रव्य.

तम्, सत, रज, गुण, भूत, भव्य

भू -अंबर, नश्वर, पंचभूत

जल-वायू, अग्नी, नभ - अंतरूप

सत्य, सर्व, वेद, चेत, प्राणि, यक्ष, रुद्र, पवित्र,

ओम् तत् सत् नमो नमः

किर्त, वज्र, नृप, धेनु, शव, गरुड़, वरुण, सर्प, ऐर, सिंह,

तारलोका, मेघलोका,अंतरिक्ष,

सूर्य, चंद्र, नक्षत्र

सर्वम शिवस्य अस्तु ॥

तस्य शक्ती मम प्रदानी!!

ॐ नम: शिवाय!”

छन! छन!

छन! छन!

ह्म ह्म!!, इश ……… (हसणं, लाजणं )

“अरे! हा नाद कसला?”

ह्म-ह्म! इशsss…..!!

“ॐ नम: शिवाय…

छन!, छन!, छनछन-छन! छनं नं नं नं नं

छन!, छन!, छनछन-छन! छनं नं नं नं नं

सळसळतं हे पाणी, हे रम्य मधुर सुर गाणी

डोळयात मिंद मद प्याले, मिसळुनि गात मी आले

या भिजलेल्या मादक अंगाला जरा स्पर्श तू कर ना

उघड ना, उघड ना! ए, तुज नयन उघड ना!

[व्याकुळता] -

हे गीत कसलं? कोण आहे माझ्या भोवती? ह्या घुंगरूचा नाद माझ्या एकांताला भंग करतोय. माझे चित्त अस्थिर होत आहे. हे …. हे कसलं विटंबण, ही कोणती परीक्षा …?

नाही! काही ही झालं तरी माझी दहा वर्षांची तपश्चर्या भंग होता कामा नये. शुक्र, चित्त एकाग्र कर, भगवान शंकराचं स्मरण कर, स्मरण कर!

ॐ नम : शिवा …

छन -छन!

मज छातीच्या आती लपले दोन टिमक-टिम तारे
पाहुनी स्तब्ध होशील, विसरशील देह-भान-जग सारे
या दुधावरी लिप लिपणारी चांदणे ओठ तू धर ना
उघड ना, उघड ना! ए, तुज नयन उघड ना!

माझं जीव कतरतंय, प्राण -गतप्राण होत आहे. माझी छातीगंद स्फुलतंय! …, ह्रिदय वेगाने धड-धड करतंय! हे …, हे मला काय होतंय? माझा नियंत्रण लुप्त का होत आहे? चित्त स्थिर का नाही राहत आहे? हे परमेश्वरा, मला शक्ती दे, मला हे संकट सहन करण्याची शक्ती दे!

पातळगंधी पुष्पवरी प्रीतीचे थेंब निथळ तू
अन
मज तुरलेल्या ओठांतील, हे नाजूक ओठ मिसळ तू
ए!.. सुंदरा!
ए!.. प्रियकरा!
या रंभेची अतृप्त तृषा प्रेमाजलने तू भर ना!
उघड ना! उघड ना! एकवारी नयन उघड ना!

निथळंगी ओलस कटि, प्रणित हनुवटी, रूप चंद्राची
चांदण्या जली मदछवी, रतन कंचनी, सुरा इंद्राची!
स्वर्गाचा नृप बावळा, असा हा लळा, लचक शृंगारा
उन्मत्त तनाचा खळा, नाद नटखुळा, चटक अंगारा!

चंद्ररूप देखणी, पितळ पापणी, निमुळ लचकारी
पैलती मंजरी सळी, अदा पंखुळी, गंधरसवारी
या भिजल्या गंधी अंगाला … इश्श! प्रेम तू कर ना
उघड ना! (कोमल स्वर )

ह्मम्मम्मम्म ….!! (ओठांतल्या ओठात हसणं )

उघड ना!! ( हलका वर )

ह्मम्मम्मम्म

उघड ना!! (वर )

इश्श!

ए, हे नयन उघड ना!!”

प्रभू, माझा ताबा सुटतोय, माझे मन…., म्.. मा.. माझे मन व्याकुळ होत आहे. मी …., म्..मी …

उघड ना,!!

उघड ना..!!

नाही! न … नाही! शुक्र, या मनाला सांभाळ! एकदा का ध्यान भंग झालं की दहा वर्षांची तपश्चर्या व्यर्थ जाईल! नाही! ते मी होऊ देणार नाही! काही झालं तरी मी …, मी माझी

उघड ना!!

उघड ना!!

धिं धातिरकीट धिं, Ⓢ धा धा धातिरकीट

धिं धातिरकीट धिं, Ⓢ धा धा धातिरकीट

[प्रस्तुत संगीत हे केरवा या तालात म्हणावा]

[Ⓢ-एक सम ]

Ⓢ तकतिरकीट तीं, Ⓢ ता ता ताताता

Ⓢधिं धातिरकीट धिं, Ⓢ धा धा धाधाधा

उघड ना!

तिरकिटतक तिरकिटतक तिरकिट

उघड़ ना

तिरकिटतक तिरकिटतक तिरकि

उघड! उघड़! उधड़! उघड़!

धी, धातिरकिट धिं, क्डधा धा धाधाधा धा!

क्डधा धा धाधाधा धा!

क्डधा धा धाधाधा धा!

[पुराणांनुसार इंद्राच्या आदेशानुसार स्वर्गीय अप्सरा धरतीवरील ध्यानस्त ऋषींचे घोर तप भंग करण्यासाठी उन्मादक नृत्य करत. त्यातील हे एक प्रख्य चित्रण.]



## 2.(शुक्राची व्याकुळता )

अरे! माझं ध्यान,माझं चित्त … सर्व कुठे गेलं? माझ्या बंद डोळ्यांभोवती हा अंधकार कसला? या पूर्वी मला केवळ प्रकाश दिसत होता, मी प्रभूच्या जगात विलीन झालो होतो. नि आता? मला तशी अनुभूती का होत नाही आहे? प्रभू! शंकरा! तुझं रूप माझ्या मनात स्थिर का नाही राहत आहे? तुझे मंत्र उच्चरताना माझं मन भटकलं. ती लीनता विलीन झाली! म्हणजेच …, म्हणजेच! माझी … म्.. माझी दहा वर्षांची तपश्चर्या भंग झाली? म्हणजे माझे दहा वर्षांचे कठोर प्रयत्न विफल झाले?

(क्रोध)

हे सर्व त्या ध्वनीमुळे झाले आहे. त्या घुंरुंच्या नादात, त्या सुरांच्या लयीत मी आपले मन गमावून बसलो! त्या गायिकेच्या सुरात उन्माद होते, उन्मत्तपणा होता! हे उन्माद म्हणजेच- सर्वात क्रूर शस्त्र! माझे डोळे बंद आहे. माझे एकाग्रचित्त भंग झाले आहे. या शुक्राला एकदा क्रोध आले तर भगवान परशुरामांप्रमाणे तो संपूर्ण पृथ्वीचं विनाश करू शकतो!!!! माझी तपश्चर्या भंग करणाऱ्याला मी भस्म करून टाकीन!!!!! त्याला दगड बनवून टाकीन!! आमरण

त्याची जीवा शुक्राची तपश्चर्या भंग केल्यामुळे तळपळत राहील!!! माझ्या दिव्य शक्तीने मी त्याला शाप देऊन भस्म करून टाकीन!!!!! खळखळत्या अग्नीज्वाळांत जसा तपन क्रोध झळझळतो तसा अग्नीरुपी क्रोध माझ्या डोळ्यात झळझळत आहे! हे डोळे आता डोळे नसून तर ते लपलपणाऱ्या कृशानूरसाचे स्फुल्लिंगन झाले आहे! या शुक्राला इतका क्रोध आला आहे की तो आता हे नयन उघडून त्या कपटी छळी इंद्राला जाळून टाकेल! मला माहित आहे की हे सर्व प्रपंच इंद्रानेच केलं असावं!! इंद्र, आता तुझा अस्तित्व कायमचं जाळून टाकेल हा शुक्राचार्य!! इं ……..द्र!!!!

छन! छन!

“हा पुन्हा आवाज!!”

“ए, प्रियकरा! तू ये ना! मज ये ना, जवळ ये ना!!”

“हा उन्माद! हे नाद, मला …., मला ओढून नेतंय. माझ्या भोवती कोणीतरी रूपवती असावी. तिचा गंध, तिचे गीत, तिचे नृत्य …, सर्व सर्व मला डोळे उघडण्यास विवश करत आहे. हे कोणतं भ्रम नाही, हे कोणती फरेब शक्ती नाही. जर हे कपट योजना असती, कुण्या अदृश्य माया शक्ती ने रुपर्ण रूप धारण करून जर माझी तपश्चर्या भंग करण्याचा प्रपंच रचला असता तर ते प्रपंच माझं काडी इतकंही न शमवता विफल झाले असते. पण हे सत्य आहे! माझ्या समोर खरंच एक रूपवती आहे जे मनापासून माझ्या सहवासाला मागण्याची विनंती करीत आहे. पण ते होणार नाही! मला माझे डोळे उघडायला हवे नि त्या रूपवंतीचे रंग कोमेजून जाईल असे भयाव:शाप तिला द्यायला हवे! जगाला या शुक्राचा क्रोध कळू दे!!

## २

दहा वर्ष! हे काही बोटांवर मोजण्यालायक लहान आकडं नव्हे! त्रीसहस्त्र षटशतम् द्विपंचाशत (६३५२) दिवस! साप्ताशीति:सहस्त्र षटशतमेन अष्टपंचाशत (८७६५८) घंटे! द्विपंचाशतलक्ष एकोणषष्टीसहस्त्र चतुरशतमेन द्विनवती: (५२५९५९२) कला! एकत्रिंशतकोटी पंचपंचाशतलक्ष नवशष्टि:सहस्त्र पंचशतमेन विंशती: (३१५५७९५२०) पळे! नि त्यात या दहा वर्षात अध्ययन केलेले त्रीषष्टीकोटी एकादशंलक्ष नवत्रिंशतसहस्त्रेन चतुर्दशम् (६३११३९०४०) शिवमंत्र!

दहा वर्ष जगातून विलीन झालेले डोळे आज क्रोधाच्या मिसाने उघडत आहे. हे कपटी जग आज माझ्या क्रोधाग्नीने मी कायमचं जाळून टाकीन! हे परमेश्वरा, मला क्षमा कर! मी तुझी सहृदय भक्ती नाही करू शकलो!

माझी डोळे उघडत आहे.

“हा प्रकाश हळू हळू माझ्या नयनात शिरत आहे. पण आता मला या प्रकाशाचाही क्रोध येतो.मला फक्त इंद्र हवा नाहीतर हे जग पुन्हा कधीच प्रकाश पाहू शकणार नाही! हा एक क्षण! फक्त हा एक क्षण इंद्र!!”

# ३

ह ....! (झटकेत शुक्राचार्यांनी डोळे उघडले. हे या प्रथमपार्श्वाचं शेवटचं भाग आहे. पुढील उताऱ्यात शुक्राचार्यांची अवस्था, त्यांचे विचार, त्यांची दिशा नि त्यांच्या मनात येणारे उलथ्य हे वर्तमान स्वरूपात मी रेखाटले आहे कारण वाचकांना 'आपणच शुक्र अहो नि पुढे जे होत आहे ते आपणच करतो आहे' अशी एक विलक्षण अनुभूती व्हावी म्हणून! यात शुक्राचार्यांची जी अवस्था आहे ते द्वि- पात्रात लिखित आहे. ते द्वि पात्र म्हणजेच - त्यांचे मन, त्यातील येणारे प्रश्न, विचार, इत्यादी."

(व्याकुळता)- मी स्तब्ध अहो! मला ...म्..मला काहीच कळत नाही.. आहे..! हे.., हे मला काय झालं? शुक्र! हे तुला काय होत आहे? तुझा क्रोध कुठे गेला? तू असा स्तब्ध का?

(मग्न स्वरूपात)- समोर बघ! एखाद्या अथांग समुद्रात वृक्षाचे पर्ण बुडून जावे तसे या शुक्राचे भान कुणाच्यातरी डोळ्यात बुडून

गेले आहे! त्या महासागरात हा शुक्र हरपून गेला आहे! त्याला आता जगाचा भान देखील राहिला नाही!

शुक्र! तू हे काय बोलतो आहेस? मुर्खा, जागा हो! भानावर ये!! वर्तमान बघ! अरे तुझी दहा वर्षांची कठोर तपश्चर्या त्या इंद्रामुळे भंग झाली! त्या कपटाचा प्रतिशोध घे! या जगाला पेटून काळ! त्या कपटी इंद्राला शाप दे! जागेवर ये शुक्र जागेवर ये!!!!

जो या जगताच नाही तो जागेवर कुठून येईन? आता माझे जग तर माझ्या समोर उभं आहे! त्या जगात फक्त मी अहो, फक्त मी. ते जग किती विलम्य आहे बघ! किती सुंदर! किती अद्भुत! किती वेगळं! आता कसला क्रोध, कसला शाप? या नाजूक पापणीच्या पंखाला डोळयांचा स्पर्श होताच माझे क्रोध आपोआप नाहीसे होत आहे. या इवल्या इवल्या निळस भुवयांच्या पातळ रेषात माझे चित्त हरपून गेले. ए! ते … ते अमृत ओठ तर बघ! शिशिर ऋतूत अलम्य समुद्राच्या बेटावर चांदण्यांच्या रसांनी तंब-तंब ओतलेले थेंब विविध रत्नांत मिसळून गेले नि त्या सुंदर आलिंगनाने केसरचांदण्यांचं एक इवलं बीज तयार झालं! शंभर वर्षे आसमंतात टिपटिपणाऱ्या मयंकच्या ओंजळीतून चंद्ररासचे चषक क्वचित

हलले नि त्यातून चंद्ररासचे शुभ्र पातळ दोन टिपटिप थेंब खाली आले! त्या थेंबांनी केसरचांदणी बीजाला कडकडून मीठी मारले नि त्या मिठीत लाल-शुभ्रित पंखुळया जुळलेल्या चंद्रपुष्पाने जन्म घेतले! त्याच पंखुळया ब्रह्मदेवाने मोठ्या अलप प्रयत्नांनी गोळा केले नि त्यांचा पुंचळा करून त्यातून ते ओठ चित्रित केले असावे!

शुक्र! तू वेडा झाला आहेस काय? तू हे काय बडबडतो आहेस? ज्या मुखातून,नेहमी कर्म, धर्म, नीती, कर्तव्य,शास्त्र, ग्रंथ श्लोक, चिंतन, मनन, परमेश्वर यांचाशिवाय एकही शब्द बाहेर पडत नाही, तेच मुख आज एखाद्या वेड्या कवीप्रमाणे काव्य रचत आहे?

ह्ह! कर्म! धर्म? नीती, कर्तव्य? शास्त्र, ग्रंथ? चिंतन,मनन? आणि कवी? वेड्या, कवीला काव्ये रचता यावी म्हणून त्याला चिंतन करावे लागते! आणि कर्म, नीती, कर्तव्य, शास्त्र हे प्रीतीचे शत्रू आहे काय? आणि परमेश्वर! साक्षात भगवान! ते सुद्धा प्रेम नाही करत काय? भगवान शंकर आणि पार्वती हे प्रीतीच्या धाग्यात बंधलेली दोन जीवं नाहीत? असं कुठलं ग्रंथ आहे जे प्रीतीच्या विरुद्ध आहे? कोणतं शास्त्र म्हणते की जीवाने प्रेम करू नये? वेड्या,ही सारी ढोंगं आहे. एकदा तरी समोर दृष्टी फेर मग तुला

कळलं! मन जेवढं दौलताकडे खेचलं जात नाही, तेवढं ते स्त्रीच्या अंगाकडं खेचलं जातं! आता कोणती नीती नि कोणतं कर्म? तिचे रूप हे माझे चिंतन, तिच्या देहाशी मिलन हे माझे मनन, हे अतृप्त तृषा माझी नीती, त्याची तृप्ती हे माझे कर्तव्य, वात्सल्य हे माझे शास्त्र, ग्रंथ हे माझे यौवन, श्लोक हे माझे उन्माद, याचना हे माझे कर्म, सुख हे माझे धर्म नि केवळ 'प्रेम' हेच माझे परमेश्वर आहे! आता फक्त त्या परमेश्वराशी मिलन होईल, आणखी काही नाही.

## ४. [शुक्र - रंभेचं संवाद ]

“कोण आहेस तू प्रिये? एवढं अद्भुत सौंदर्य आसमंतात शोधल्यावरही मिळणार नाही असं तुझं हे रूप आहे! काय तुझं रूप, काय तुझं सौंदर्य! कोणी ओळखावा चंद्र कोणता-भूवरीचा की नाभीचा?”

“इश्श! तुमच्या शब्दांनी आम्हास घायाल केले.”

“घायल तर आम्ही आधीच झालो प्रिये! या नजरेत पडून! ते गीत ऐकून! या अंगाचं रोम रोम तुझ्या नाजूक बाहूंच्या घट्ट आलिंगनात मिसळून जायला आसून गेला आहे! आता हा शुक्र या जगात राहिला नाही. तो कुठेच नाही.”

“इथे पण नाही?” [वरचं अंकुश निमुळत बोटांनी खाली सरकावताना ]

“नाही!” [सद्गद स्वरात ]

“इथे?”. [आणखी खाली करताना ]

“अ...हं”.

“आता?”. [अर्धछटा निमुळती झाली. छातीत गुंडाळलेलं वस्त्रांकुश अर्ध खाली निसटलं. नि बोट तेथे खूण झाला]

“ना..ही!”

“आता पण नाही?”

“अ…हं! आणखी!!”

“आता?”. [अंकुश सरकावलं! उन्माद उदात्त झाला! ते बघताच शुक्राचार्य स्तब्ध राहिले.]

“हो!”

“हि दोन चांदणं …… फारच मादक आहे ह!” …. [अनिमिष पातळ स्वरात]

“मला हवी!”

“अ..हं!”

“मला हवी!”. ती नाही म्हणत समोर येत आहे. तिची मान मादक इशाऱ्यात कधी डावी तर कधी उजवीकडं हलती आहे. आली, ती जवळ अली, बस … दोन पावलं अजून!

“मला हवी!”

“अ … हं!” [आता… फक्त एक पाऊल शिल्लक!

“मला हवी!”

“ना …… ही!” [ह्रिदय गतप्रण होऊ लागलं आहे!].

“मला हवी!!”

“ना …..” [जवळ, अगदी जवळ!”]

“मला …. उम्म्..!” [ओठांत ओठ मिसळले! देहात देह मिसळले!] “ह्ह! ह्ह! ह्ह..सुख! सुख!! “

“आ.., आ..! ह्ह.., ह्ह! ह्ह! उम्म् …उम्म्!! सुख, आणखी! आणखी!! शुक्र, आणखी!! आणखी!!!!!”

क्रिया करताना –

“शिला!”

उम्म..!!!”

“अहं!

उम्म्..!!!”

“तळप!”

उम्म् …!!!”

“रंभे! रंभे!!!”

“शुक्र! शुक्र!!!”

“सुख! सुख! आनंद!! आनंद!!!”

“आअ ...!! अह्ह!! अह्ह् ... ब्रह्मानंद!!!!”

इति ‘पुरु’- प्रथम पार्श्व संपूर्ण

********

# मनोगत!

'पुरु' हे खरंतर एक कादंबरी आहे जे की सध्या माझं लिहिणं सुरु आहे. ही कादंबरी एका दिशने बघीतलं तर एक 'पौराणिक प्रेम सत्य' या विषयाला अनुसरून पुढे लिहिली जाणार. द्वापार युगातील घडलेली 'उर्वशी आणि पुरुरवा' ची अद्भुत प्रेम कथा या कादंबरीत रेखाटली जाईल. म्हणूनच या कादंबरीचे नाव - उर्वशी आणि पुरुरवा यांची जोडाक्षरे जोडून 'पुरु' असं मी ठेवलं. मग वाचकांच्या मनात एक प्रश्न नक्कीच आला असेल की या संपूर्ण प्रथम पार्श्वात या दोघांपैकी एकाचंही उल्लेख का आलं नाही? वैयक्तिकरित्या, या प्रश्नाचं उत्तर लेखकच देऊ शकणार- म्हणजे मी!

'ही कादंबरी एक 'काल्पनिक सत्य' आहे असं मी आपणास सांगतो. खरंतर, प्रथम पार्श्वात 'उर्वशीचा जन्म' कसा होईल याची 'आकाशवाणी' शुक्राचार्य करतात. पौराणिक संदर्भानुसार इंद्र, अप्सरा रंभा, मेनका, उर्वशी यांची कित्येक तरी संभोग कथा वेगवेळगी आढळतात. मान्यतेनुसार इंद्र हा एक भोगी आणि छळी राजा म्हणून ओळखला जातो. त्याला त्याचे स्वर्ग सर्वाधिक प्रिय असते. धर्तीलोकावर कोण्या ऋषी- मुनींनी तप आरंभ केले आहे याची चाहूल लागतातच इंद्र त्यांची तपं भंग करण्यास अप्सरांचा

वापर करतो. - हे रिग्वेद, वजुर्वेद आणि अनेक पुराणांमध्ये आढळणारं सत्य आहे. रंभा, इंद्र आणि शुक्र ही पुराणचित्रे मी संपूर्णपणे काल्पनिक स्वरूपात लिहिली आहे. रंभेचं चरित्र पुढे आणखी गर्त होत जातो. रंभा -स्वर्लोकाची सर्वात पहिली सौंदर्यपूर्ण अप्सरा जे इंद्राची आवडती होती आणि इंद्राने देवांपासून तिला प्राप्त केले होते. दस्युना स्वर्ग मिळावे म्हणून दैत्यगुरू शुक्राचार्यांनी संजीवनी विद्या हस्तगत करण्यासाठी तप आरंभ केले. इंद्राने ते भंग व्हावे म्हणून खूप प्रयत्न केले, पण अखेरीस तो विफल झाला.शेवटी इंद्राने रंभाचा वापर करून आपलं काम काढून घेतलं नि तो सफल झाला. रंभा आणि शुक्राच्या संभोगाने उर्वशी जन्माची आकाशवाणी झाली, हे मी रेखाटलं नाही आहे. कारण प्रणयेच्या सागमनात मनात कुठलाही अन्य विचार येणे अशक्य आहे. रंभा आणि शुक्र यांचा संभोग चार वर्ष चालला. याच मधात शुक्राचार्यांना मदिरेचे मोह लागले. याचं कारण ही रंभाच होती.


शेवटच्या उताऱ्यावर ‘क्रिया करताना’ या उताऱ्यात लिहिलेलं प्रसंग वाचक समजले तर असतील पण ‘शिला, अहं आणि तळप’ हे शब्द वाचून वाचकांच्या मनाचा नक्कीच गोंधळ झाला असतील हे मला ठाऊक आहे! तर मला आपणास हे सांगायला पाहिजे की या प्रथम पार्श्वात मुख्य उतारा केवळ हे तीन

शब्द आहे! त्या वेळेस प्रणाया करत असताना शुक्रांच्या मनात अचानक एक अनामिक-घृण्य विचार स्पर्श झाला. त्या वेळेस दोघेही सुखात मग्न होते. तो प्रसंग मी खाली योजितो आहे –

अचानक सहवास करता करता शुक्राचार्य तब्द उठले नि दूर झाले. ते दिवाणाच्या लांब जाऊन काहीतरी हळव विचार करत होते. त्यांची मुद्रा व्याकुळ होत होती.त्यांच्या मनात विचारांची घोंगलोळ फिरत होती. त्यांचे अंतर्मन आतल्या आत लज्जित होत होते. ”शुक्र! हे..हे तू काय केलं? मुर्खा, हे काय केलंस तू? एका अप्सरेच्या नादात पडून आयुष्याचे चार वर्ष वाया घालवलेस? अरे कुठे गेली तुझी एकाग्रशक्ती? कुठे गेला तुझा जीवनाचा उद्देश्य? ते विसरलास का? जिच्यामुळे आपली दहा वर्षांची तपश्चर्या विफल झाली तिला शाप देण्याऐवजी तू तिच्याशी रहंमग्न झालास? आज स्त्रीच्या सौंदर्याने तुला, तुझ्या कर्माला, तुझ्या जीवनाला पराभूत केलं! तू विफल झालास शुक्र, तुझं जीवन व्यर्थ झालं!!”

शुक्राचार्यांना आत्मानुभूती झाली. ते लज्जेने व्याकुळ होत आहे हे सर्व रंभेच्या ध्यानी आलं. आता शुक्राचार्य आपल्याला भयंकर शाप देईल अशी भीती तिला वाटू लागली. “आता काय करावे? शुक्राचार्यांना आता क्रोध येईल नि ते आपले जीवन गिळून

जाईल. रंभे, तुला काही तरी करायला पाहिजे! शुक्राचार्यांना रोध, काहीतरी कर रंभे काहीतरी कर!"



रंभेची अवस्था देखील चिंताग्रस्त झाली होती. पण त्याच वेळी तिला तिच्या कानाभोवती इंद्राचे शब्द ऐकू येऊ लागले. - 'तुला शुक्राचार्यांना हवं ते द्यावं लागेल!'

शुक्र आणि रंभा यांच्या एकांताला चार वर्ष झाले होते. परंतु शुक्रांची आत्मानुभूती बघताच तिचे कंठ शुष्क पावले. पण इंद्राच्या सांगितल्यानुसार रंभेने आपलं रक्षण केलं. शुक्राचार्यांची तप्त बुद्धी

नि क्रोधीत मुख जेव्हा तिला क्वचित दिसले तेव्हा तिने शुक्राचार्यांच्या मुखावर आपले मुख ठिपून दिले. ते काही कटू शब्द मुखातून बोलण्याआधीच रंभा त्यांचे मुख तिच्या चुंबनाने बंद करून देई. तपश्चर्या भंग कारण्यावेळेसही जेवढा प्रीतीचा उन्माद रंभेच्या मुद्रेवर नव्हता त्याहून अधिक आता तो दिसत होता. पण त्यावेळी शुक्राचार्यांनी मनातल्या मनात हे तीन शब्द उच्चरले - "शीला!" मग त्यावरी रंभेचं एक चुंबन मुखी पडलं. "अहंकार!" उच्चरताच दुसरं चुंबन आणि "तळप!" उच्चरताच एक आणखी चुंबन! मस्तकात तप्त जळणारे क्रोधाचे कृशानू ओठातील अमृताच्या रसात मिसळून जाऊन शांत होत होते.पण त्यातून अग्नीचे तीन स्फुल्लिंगन आधीच बाहेर फुटले होते! काही केल्या शुक्राला ही नंतर विसर पडला नि ते दोघे ही पुन्हा सागमनात मग्न झाले.असं करत करत आणखी चार वर्ष शुक्र आणि रंभा सागमनात मग्न राहिले. नंतर एका दिवशी रंभेचं मन उबून गेलं. शुक्राचार्य देखील भानावर आले.त्यांना त्यांचा वर्तमान आणि भूतकाळ कळला. त्यांना आत्मलज्जा झाली. ते ग्लानीच्या समुद्रात बुडून क्रोधाची ठोकरे खाऊ लागले. त्यांना फार क्रोध आला. रंभेला शाप देऊन भस्म करून टाकावं असं त्यांना वाटलं ; परंतु एका बाजूने त्यांचा लज्जित मन त्यांना विवश होता. "आपण काय म्हणून या रंभेला शाप देऊ? आपण तिचा आठ वर्ष उपभोग घेतला आहे.

तिच्या शरीराचे सुख आपण लुटलो अहो. यात चूक माझी आहे, मी तिला का शाप द्यवा?" पण त्यांच्या तोंडून शाप आधीच निघाले होते याचा कदाचित त्यांना या चार वर्षात विसर पडला!

तदनंतर रंभा स्वर्गलोकात परतून गेली. आणि शुक्र मदिरेच्या व्यसनात जगू लागले. नंतर त्यांना देवयानी नावाची मुलगी झाली ज्यामुळे त्यांनी मदिरेचा मोह त्यगला आणि राक्षसांसाठी संजीवनी विद्या मिळवली.

त्या तीन शब्दांचा अर्थ असा होता -

**शीला** - विश्वामित्रच्या तापला भंग करण्यास रंभा धर्तीवर पुन्हा उतरली होती. परंतु ऋषी विश्वामित्राने तिचा माया प्रपंच ओळखला नि तिला शाप दिले की ती आमरण एका दगडाच्या रूपात बदलून जाईल. ही देखील एक स्वतंत्र कथा आहे.

**अहंकार**- रंभेने ऋषी शुक्राचार्यांचे तप भंग करण्याचे साहस केले कारण तिला तिच्या सौंदर्यावर अहं होता. हे विधान सत्य होतं हे आपण 'रंभा भाग -2" मधून बघू शकतो. म्हणून तर या रूपवती अप्सरेला पृथ्वीवर उतरून मदोत्त करण्याचे साहस आले. सौंदर्याचा अहंकार मनात खोटी टिटवी फुलवतो की त्रिलोकात आपल्याहून सुंदर आणखी कोणीच नाही. हे अहं तोडणे अनिवार्य होतं. म्हणून आकाशवाणीने काही काळानंतर 'उर्वशी' नामक त्रैलोक्यसुंदरी चा

जन्म पायी घातला जिच्या सौंदर्याला बघून इंद्र, समस्त स्वर्ग आणि सर्व अहंकारी अप्सरांचा घमंड चकचूर झाला. हे सर्व या कादंबरीत पुढे रेखाटलं जाईल.

**तळप-** शुक्राचार्यांच्या मनात केवळ रंभे बद्दलच क्रोध नव्हते अपितु ‘इंद्र’ हा त्यांचा प्रमुख शत्रू होता. उर्वशीच्या सौंदर्यात बुडून जाऊन इंद्राला तिच्याशी प्रणयेची इच्छा होते. परंतु त्यावेळी उर्वशी आणि पुरुरवा यांचा प्रेम सहवास समस्त त्रिलोकात प्रख्यात होतो. स्वतःवर ताबा न असलेल्या इंद्राला हे कळताच तो उर्वशीला हजार वर्ष धरतीवर एका सामान्य स्त्रीप्रमाणे जीवन जगण्याचे शाप देतो. उर्वशी धरतीलोकात जाते नि मग तिची राजा पुरुरवाशी भेट होते. ते दोघे ही विवाह करतात आणि त्यांच्या जीवनात सुखी राहतात. पण इंद्र मात्र स्वर्गात उर्वशीसाठी तळमळत असतो. त्याला उर्वशीचे सहवास हवे असते पण ते काही त्याला प्राप्त होत नाही. आणि अशाप्रकारे ही आकाशवाणीदेखील सत्य ठरते.

या पूर्ण कथांचा विस्तार मी स्वातंत्ररित्या आणि स्वकौशलाने नक्कीच मांडीन. हे प्रथम पार्श्व केवळ - इंद्राचं चरित्र, रंभेचं चरित्र, त्याकाळी होणारे रीत, कपट, छळ आणि कामुकवृत्ती आणि प्रमुख म्हणजे -''उर्वशी जन्माची आकाशवाणी'' कशी झाली, का झाली आणि कोणासाठी झाली याचा एक अल्प सार येथे चित्रित केला आहे. माझ्या 16 वर्षीय बालमानाने ययाती कादंबरी वाचून हे 'पुरु' कादंबरी लिहिण्याचे साहस केले. वाचक भले ही स्पष्ट शब्दांत 'कथा फारच उन्माद झाली आहे' हे मला कळवायला संकोच करेल पण मला हे नक्की ठाऊक आहे की कथा एकांतात वाचताना त्यांचे रोम रोम पुलकित होऊन जाईल! मी प्रगल्भ तत्त्वचिंतक आणि लेखणीचे बादशाह -श्री श्री वि.स खांडेकरांना ही कादंबरी अर्पित करतो. 🙏🙏

वाचकांचा सकारात्मक प्रतिसाद जर स्वतंत्रपणे मिळेल तर फारच छान !!

शेवटी हेच बोलतो -

"आम्हा घरी धन शब्दांचिच रत्ने। शब्दांचिच शस्त्रे यत्नेकरू ।।१।।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोका ।।२।।
तुका म्हणे पहा शब्द चि हा देव । शब्दे चि गौरव पूजा करू ।।३ ।।"

## **कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?**

कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?
खरं थोडं खाली, वर खऱ्यावरची साय!
थोडं मीठ, थोडी मिर्ची, खरं लपवत नाही.
ज्याचं जळतं त्याला कळतं, पाणी थांबत नाही.
एकीकडे कथा म्हणजे पडद्याआडची आग
दुसरीकडे कथा म्हणजे लपवलेला राग
थोडं प्रेम, थोडा द्वेष, थोडी धाय धाय
कथा म्हणजे तुम्ही-आम्ही दुसरं-तिसरं काय?

ई साहित्यवर हजारहून अधिक दर्जेदार कथा.
आनंद घ्या. आनंद द्या.

Whatsapp: 9987737237

www.esahity.com

esahity@gmail.com